

महात्मा फुले स्मृतिशताब्दी

# महात्मा फुले आणि शेतकरी चळवळ

MR 891.468
C 395 M

डॉ. अशोक चौसाळकर

INDIAN INSTITUTE
OF
ADVANCED STUDY
LIBRARY, SHIMLA

# महात्मा फुले आणि शेतकरी चळवळ

डॉ. अशोक चौसाळकर

Entered

लोकवाङ्मय गृह

**महात्मा फुले आणि शेतकरी चळवळ** / डॉ. अशोक चौसाळकर

Library IIAS, Shimla
MR 891.468 C 395 M
00124303

म / १०३२
© डॉ. अशोक चौसाळकर
दुसरी आवृत्ती : मार्च १९९८
तिसरी आवृत्ती (I) : मे २००१
चौथी आवृत्ती (I) : नोव्हेंबर २००३
पाचवी आवृत्ती (I) : डिसेंबर २००७

मुखपृष्ठ : कमल शेडगे

MR 891.468 C 395 M

मूल्य : २० रुपये

124303
31.3.08

मुद्रक/प्रकाशक
प्रकाश विश्वासराव
लोकवाङ्मय गृह
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड, प्रभादेवी
मुंबई - ४०० ०२५

मुद्रणस्थळ
न्यू एज प्रिंटिंग प्रेस
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड
प्रभादेवी
मुंबई - ४०० ०२५

महात्मा जोतीराव फुले स्मृतिशताब्दीनिमित्त त्यांच्या मूलभूत विचारांवर पुस्तक रूपाने ऊहापोह करणारा उपक्रम करावा असे आमच्या मनात आले. त्याचे कारण विद्यमान भारतातील व महाराष्ट्रातील एकूणच वैचारिक व मानसिक स्थितीगती पाहता पुन्हा एकदा नव्याने महात्मा फुल्यांच्या कार्याचा मागोवा घ्यावा, जेणे करून सर्वसाधारण वाचकांना आणि कार्यकर्त्यांना त्यांच्या विचारांच्या व कार्याच्या एकेका महत्त्वपूर्ण विभागाचा मूळ गाभा परिचित व्हावा हे आहे. वैचारिक संघर्षात गुंतलेल्या आपणा सर्वांना त्यातील गांभीर्य कळले तर ती चळवळ अधिक वस्तुनिष्ठ व भक्कमपणे उभी राहते, असा अनुभव आहे.

ह्या पुस्तिका मालिकेत लेखन करणारी सर्व विचारवंत मंडळी आपला प्रागतिक वारसा सांगत व समोरच्या समस्यांची वैज्ञानिक दृष्टिकोनातून उकल करू पाहणारी आणि वस्तुनिष्ठ भूमिका ठेवून प्रबोधनाच्या सर्वव्यापी चळवळीत गुंतलेली आहेत.

वाचक आणि कार्यकर्ते ह्या मालेचे स्वागत करतील असा आम्हाला पूर्ण भरवसा आहे.

**— प्रकाशक**

Library IIAS, Shimla
MR 891.468 C 395 M
00124303

# अनुक्रमाणिका

प्रास्ताविक / १

प्रकरण पहिले

एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील शेतीव्यवस्था / ४

प्रकरण दुसरे

म. जोतीराव फुले आणि शेतकरी चळवळ / १७

प्रकरण तिसरे

महात्मा फुले यांचे शेतकरी प्रश्नांविषयी विचार / २३

प्रकरण चौथे

महात्मा फुले यांच्या चळवळीचे राजकीय स्वरूप / ४५

संदर्भ ग्रंथ / ५७

# प्रास्ताविक

म. जोतीराव फुले यांच्या मृत्युला १९९० साली शंभर वर्षे पूर्ण झाली. त्यांनी त्यांच्या काळात जे विचार मांडले ते आपणा सर्वांस आज महत्त्वाचे वाटत आहेत. कारण म. फुले द्रष्टे विचारवंत होते. अनेक बाबतीत ते काळाच्या फार पुढे होते. शेती प्रश्नावरही त्यांनी अतिशय मोलाचे विचार मांडले होते. त्यांच्या काळात शेतीविषयी निर्माण झालेले प्रश्न आज जास्त तीव्र स्वरूपात उभे राहिले आहेत. न्याय्य आणि समताधिष्ठित समाजरचना स्थापन करण्याचा, जातिनिर्मूलनाचा, श्रम करणाऱ्या शेतकऱ्यास त्याच्या श्रमाचा मोबदला देण्याचा आणि लोकांची धर्म आणि संस्कृती यांच्यामुळे निर्माण झालेली गुलामगिरी नष्ट करण्याचा प्रश्न आजही महत्त्वाचा आहे. हे प्रश्न आजही कायम असल्यामुळे ते जिकिरीचे बनत असल्यामुळे आपणास पुनःपुन्हा जोतीरावांच्या विचारांकडे जावे लागते. त्यांच्या विचारांच्या प्रकाशात हे प्रश्न समजावून घ्यावे लागतात.

म. जोतीराव फुले यांच्या काळात महाराष्ट्रात शेतकरी सरंजामशाही, सावकारशाही आणि साम्राज्यशाही यांनी नाडलेला होता. त्या काळात इंग्रज साम्राज्यवाद्यांनी शेतकऱ्यांची पूर्ण नागवणूक केली होती. शेतकऱ्यांच्या अठराविश्व दारिद्र्याचे अत्यंत प्रत्ययकारक वर्णन म. फुले यांनी केले होते. ते लिहितात –

*काया पुरती लंगोटी । फिरती नांगराचे पाठी ।।*  
*एक घोंगड्यावाचूनी । स्त्रिया नसे दुजे शयनी ।।*  
*ढोरामागे सर्वकाळ । पोरे फिरती रानोमाळ ।।*  
*ताक कण्या पोटभरी । धन्य म्हणे संसारी ।।*  
*सरकारी पट्टी नेट । पडे तीन शेंड्या गाठ ।।*  
*कर्जरोखी लिहिले आट । निर्दय मारवाडी काट ।।*  
*अज्ञान्याला समजत नाही । कुलकर्ण्याने लिहिले काही ।।*  
*वकिलाची महागाई । न्यायाधीशा दया नाही ।।*  
*पाप पुण्य जेथे नाही । पैशापुरते दादाभाई ।।*

जोतीरावांच्या पुढे मुख्य प्रश्न हा होता की दिवसभर उन्हातान्हात घाम गाळणारा, जगाचा पोशिंदा शेतकरी दु:खी आणि सरकारचा कामचोर, लाचखाऊ नोकरशहा सुखी असे कां व्हावे? अवयव आणि बुद्धी सारखीच असताना समाजात विषमता कां आहे? हा प्रश्न त्यांना पडला होता. आपल्या 'गुलामगिरी', 'शेतकऱ्याचा आसूड', 'इशारा' वगैरे पुस्तकांतून त्यांनी या संबंधी आपले विचार मांडले.

शेतकऱ्यांच्या सर्वांगीण मुक्तीचा विचार जोतीरावांनी मांडला. त्यांनी असे मत मांडले की, परकीय आर्यांनी येथील क्षत्रियांवर हल्ले करून त्यांना गुलाम केले. येथील शेतकऱ्यांचा राजा बळी यास त्यांनी कपटाने पराभूत केले. त्यानंतर शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेस सुरुवात झाली. हे दैन्य जर दूर करावयाचे असले तर पुन्हा 'बळीचे राज्य' स्थापन केले पाहिजे. म. फुले यांची धेय्यदृष्टी लोकसत्ताक राज्य–कष्टकऱ्यांचे लोकशाही राज्य–स्थापन करणे ही होती. शेतकऱ्यांची चळवळ त्या दिशेनेच चालविली पाहिजे असे त्यांचे मत होते.

म. फुले यांनी 'शेतकऱ्याचा आसूड' या पुस्तकात अनेक प्रश्न चर्चिले आहेत. त्यांच्या मते शेतकरी हा केवळ सरकारी धोरणामुळे किंवा दुष्काळामुळेच नागवला गेलेला नाही तर त्याचे सर्व अंगाने शोषण होत आहे. ते शोषण धर्माच्या नावाने, जातीच्या नावाने, संस्कृतीच्या नावाने होत आहे. हे शोषण शेतकऱ्यांच्या अज्ञानामुळे, त्याला विद्या नसल्यामुळे होत आहे. त्याची या सर्व गुलामगिरीतून मुक्तता करावयाची असेल तर सर्वांगीण परिवर्तन होणे गरजेचे आहे. धर्म, संस्कृती, राजकारण, जातीनिर्मूलन, शिक्षण, शेती हे प्रश्न एकमेकांत गुंतलेले आहेत आणि शेतकऱ्याची गुलामगिरीतून सुटका करावयाची असेल तर या सर्वच क्षेत्रात मूलभूत परिवर्तन करणे गरजेचे आहे.

आज म. फुले यांच्या मृत्युला १००वर्षे पूर्ण झालेली आहेत. पण त्यांनी वर मांडलेले प्रश्न पूर्णांशाने सुटलेले नाहीत. आज शोषणाचे प्रकार बदलले आहेत, काही बाबतीत शोषणकर्ते बदलले आहेत. पण शोषण मात्र

कायम आहे. शेतकऱ्यांची—विशेषत: कोरडवाहू शेतकऱ्यांची—परिस्थिती अजूनही म. फुले लिहितात त्याप्रमाणे ''ताक कण्या पोट भरी । धन्य म्हणे संसारी' अशीच आहे. त्यामुळे आज पुन्हा फुले यांच्या विचाराकडे जाणे गरजेचे बनत चालले आहे. आजच्या शेतकरी चळवळीचा कार्यक्रम आता आपणास फुले विचारांचा मागोवा घेत ठरवावा लागतो आहे. यात त्या विचारांचे क्रांतिकारत्व दडलेले आहे.

आज जातीचा प्रश्न निकराचा बनलेला आहे. शूद्रातिशूद्रात फूट पडली असून शेतकऱ्यांतही वर्गीय थर पडले आहेत. त्यातील काही गट स्वत:चे वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत आहेत. शेती आणि पाणी, पाणी व्यवस्थापन व पर्यावरण, नोकरशाहीची लाखचोरी व बेमुर्वतखोरपणा हे प्रश्न महत्त्वाचे बनले आहेत. म. फुले यांनी या विषयावर मोलाचे विचार व्यक्त केले होते. त्या अनुरोधाने स्वत: कष्ट करणारा 'कनिष्ठ व मध्यम' शेतकरी आणि अतिशूद्र यांना केंद्रबिंदू कल्पून नव्या शेतकरी चळवळी उभ्या कराव्या लागणार आहेत. शोषकाचे रूप बदलले तरी शोषण कायम आहे. त्याविरुद्ध सर्वच पीडित आणि दलित वर्गांनी संघर्ष करणे गरजेचे आहे. फुले-विचार त्यासाठी आजही मार्गदर्शक आहे.

❒❒❒

## प्रकरण पहिले

# एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील शेतीव्यवस्था

महात्मा जोतीबा फुले (१८२७-९०) यांनी आपले कार्य मुख्यत: एकोणिसाव्या शतकात केले. अव्वल इंग्रजांपासून काँग्रेसच्या स्थापनेपर्यंतचा काळ जोतीरावांनी पाहिला. एकोणिसाव्या शतकातील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थितीचा जोतीबांच्या विचारावर मोठा प्रभाव पडला होता. जोतीबा जन्मास आले त्यावेळी महाराष्ट्रात मराठ्यांचे राज्य लयास जाऊन फक्त दहा वर्षेच झाली होती. मुंबई प्रांताचे मुख्य लॉर्ड एल्फिन्स्टन हळूहळू नव्या राज्याची घडी बसवीत होते. या मोठ्या धामधुमीच्या काळात जोतीराव फुले यांचे बालपण गेले. त्या काळातील पुणे शहर म्हणजे ब्राह्मणी वर्चस्वाचे माहेरघर. धर्म, समाजकारण आणि राजकारण या तिन्ही क्षेत्रात ब्राह्मणांचे वर्चस्व असलेल्या गावात फुले वाढले. त्यामुळे त्यांना ब्राह्मणशाहीचे सर्व दोष पूर्णपणे कळले. त्याबद्दल त्यांच्या मनात मनस्वी चीड निर्माण झाली. फुल्यांच्या लिखाणीत जी आक्रमता आणि जो आवेश आहे त्याचे कारण त्या काळातील शिरजोर ब्राह्मणशाही हे आहे. ही ब्राह्मणशाही पेशवाईचा वारसा सांगत होती. पेशवाईचा ऱ्हास आणि ऱ्हासाची कारणे सांगत होती.

इ. स. १८१७ साली दुसऱ्या बाजीरावाचा कोरेगावच्या लढाईत पराभव झाला व १८१८ साली त्याने मालकमपुढे शरणागती पत्करली. त्यामुळे काही मोठी संस्थाने वगळता महाराष्ट्रातील आणि गुजरातेतील पेशव्यांचे राज्य इंग्रजांच्या ताब्यात गेले. इंग्रजांच्या शिस्तबद्ध कवायत सैन्यापुढे, बंदुकांपुढे व तोफांपुढे मराठ्यांचा निभाव लागला नाही. बाजीरावांचे ३३,००० शिपाई इंग्रजांच्या २,७०० शिपायांच्या फलटणीपुढे हतबल ठरले. पेशव्यांपेक्षा सर्वच बाबतीत वरचढ असणाऱ्या इंग्रजांनी पेशवाईचा नाश केला. पुणे शहरावर इंग्रजांचे निशाण लागले.

पेशवाई राज्यव्यवस्था ही सरंजामशाही राज्यव्यवस्था होती. सरंजामशाही

ही प्रत्येक बाबतीत भांडवलशाहीपेक्षा कमकुवत असते. त्यातच थोरल्या माधवरावांच्या मृत्यूनंतर मराठेशाहीत अव्यवस्था व बजबजपुरी माजली. दुसऱ्या बाजीरावाच्या काळात तर समाज व राज्यव्यवस्था नासलेल्या अवस्थेस पोहोचलेली होती. त्यामुळे त्या काळात पेशवाईचा ऱ्हास होणे केवळ अपरिहार्य बनले होते.

पेशवाईच्या उतरत्या काळात सरंजामदारांचा जाच मोठ्या प्रमाणात वाढला होता. पेंढाऱ्यांनी व छोट्यामोठ्या लुटांरूनी रयतेस नाडले होते. दुसऱ्या बाजीरावाने प्रजेवर अनेक नवे कर लादले. करवसुली करण्यासाठी त्याच्या अधिकाऱ्यांनी प्रजेवर अनन्वित जुलूम केले. पेशवाईत धर्माचे व कर्मकांडाचे प्राबल्य वाढले. पेशवे स्वत: ब्राह्मण असल्यामुळे अनेक नव्या धार्मिक परंपरा पुन्हा सुरू झाल्या. ब्राह्मण विधेवेने केशवपन करावे म्हणून सक्ती होऊ लागली. वेदोक्त विधी करणारे सोनार, क्षत्रिय व शेणवी पेशव्यांच्या क्रोधाचे बळी पडले. कलीयुगात फक्त ब्राह्मणच द्विज आहेत, बाकी सर्व शूद्र आहेत हा विचार बळावला. पेशव्यांनी आपल्या राजसत्तेचा वापर करून ब्राह्मणी धर्मातील अनेक परंपरा पुन्हा सुरू केल्या. पेशवाईत समाजावर ब्राह्मणी धर्माचा प्रभाव वाढला तसा त्यांचा स्त्री-शूद्रांवरील अन्याय वाढला. शेतकऱ्यांकडून आणलेला पैसा सरकार भोजनभाऊ भटभिक्षुकांना फुकट वाटत असे. त्यामुळे श्रम न करता खाणाऱ्यांचे दुराचार व अनाचार वाढले. समाजाच्या अंगावर सूज असणारे हे निरुपयोगी ब्राह्मण भिक्षुक पेशवाईच्या ऱ्हासास कारण झाले.

पेशवाईच्या ऱ्हासाचे कारण तत्कालीन समाजाचे सर्वांगीण मागासलेपण हे होते. त्या काळातील आर्थिक विचार मागासलेले होते. आर्थिक रचना मागासलेली होती. राज्यव्यवस्था मागासलेली होती, सामाजिक विचार प्रतिगामी होते. समाजात जातीमुळे दुही पडलेली होती. एकतेचा अभाव होता. युद्ध-नीती व लढाईची हत्यारे मागासलेली होती. स्वामीभक्ती हेच मूल्य महत्त्वाचे मानले जात होते. राष्ट्रप्रीती अजून उदयास यावयाची होती. थोडक्यात, त्या समाजव्यवस्थेत नवनिर्माणाची बीजे नव्हती. तिचे पुनरुज्जीवन त्या काळात शक्य नव्हते. सर्व भारतभर जवळपास हीच

परिस्थिती कमी-जास्त प्रमाणात होती. त्यामुळे इतर राज्यांबरोबरच पेशवाईचा ऱ्हास होणे अपरिहार्य ठरले. मराठेशाहीतील सरंजामी शेतीव्यवस्था मराठ्यांच्या काळात भारतात पूर्वापार चालू असलेली शेतीव्यवस्था अस्तित्वात होती. साराबंदी, भूमापन वगैरे क्षेत्रात मलिकेवर, शिवाजी, थोरले माधवराव पेशवे यांनी बदल घडवून आणले. पण ते अगदी मूलभूत नव्हते. रयत आणि राजा यांच्यातील मध्यस्थ दूर करण्याची शिवाजीची इच्छा होती. पण त्यांच्या काळाचा विचार करता तिची अंमलबजावणी करणे केवळ अशक्य होते. त्यामुळे जुनीच सरंजामशाही शेतीव्यवस्था कमी-जास्त बदलासह कायम राहिली. या सरंजामशाही रचनेत जातिसंस्था, बलुतेदारी पद्धती आणि जात आणि गोत पंचायतीस महत्त्वाचे स्थान होते. मराठेशाहीतील शेतीव्यवस्था ही सरंजामशाही शेतीव्यवस्था होती. त्या व्यवस्थेची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे होती :

(१) मराठेशाहीत शेतीवर वैयक्तिक मालकी नव्हती. शेती तशी सामुहिक मालकीची होती. सरकारने काही अटींवर ती शेतकऱ्यांना कसायला दिली होती.

(२) गावात मिरासी व उपरी असे शेतकऱ्यांचे दोन प्रकार होते. मिरासदार हे गावच्या वसाहतीपासून शेताचे वहिवाटदार होते. उपरी शेतकऱ्यांना कौलनामा देऊन शेत कसण्यासाठी बोलावले जाई.

(३) राजा आणि शेतकरी यांच्यात तसे प्रत्यक्ष संबंध नव्हते. राजा आणि शेतकरी यांच्यात देशमुख, मामलेदार आणि पाटील हे अधिकारी होते. गावचा शेतसारा मामलेदार आणि पाटील परस्परांशी विचारविनिमय करून ठरवीत असत.

(४) शेतसाऱ्याची आकारणी व्यक्तिशः होत नसे. संपूर्ण गावाचा शेतसारा ठरविला जाई. तो गोळा करण्याचा आणि सरकारच्या खजिन्यात भरण्याचा अधिकार पाटलास होता.

(५) गावात पाटलाबरोबरच गावपंचायतही महत्त्वाची भूमिका पार पाडत असे. शेतसारा पाटील गाव पंचायतीशी सल्लामसलत करून ठरवीत असे.

शेतीच्या हस्तांतरणावर पंचायतीचे नियंत्रण होते.

(६) त्या काळात गावात गुजर, वाणी, मारवाडी यांची सावकारी होती. शेतकरी त्यांच्याकडून कर्जही घेत. पण कर्जाच्या मोबदल्यात शेत लिहून देण्याची पद्धत नव्हती. त्याशिवाय दामदुप्पटीचा कायदा त्यावेळी प्रचलित होता. एकदा व्याज मुद्दलाइतके झाले म्हणजे त्यापेक्षा जास्त पैसा वसूल करण्याचा अधिकार सावकारास नव्हता. सावकाराला कर्ज वसूल करण्यासाठी राज्यसंस्था मदत करीत नसे. त्याला त्यासाठी पंचायतीकडे फिर्याद करावी लागे. आपल्या कर्जाची वसुली करण्यासाठी सावकर शेतकऱ्याच्या घरासमोर धरणे धरीत असत.

(७) सरंजामदारी व्यवस्थेत शेतकऱ्यावर सावकारांचा जुलूम वेगळ्या प्रकारचा होता. सरकार मोठ्या सावकारांकडून कर्ज घेत असे आणि त्या कर्जाची भरपाई करण्यासाठी मुलखातील सारा वसुली करण्याचा अधिकार सावकारास दिला जाई. पैसा वसूल करण्यासाठी सावकार शेतकऱ्यांवर जुलूम करीत असत.

पण पेशवाईत दुसऱ्या बाजीरावाच्या काळात शेतकऱ्यावरील जुलूम वाढला. कारण त्याने शेतसाऱ्या व्यतिरिक्त इतर अनेक नवे कर शेतकऱ्यांवर लादले. हे कर पाटील व मामलेदार यांच्याकडून वसूल करून घेण्याऐवजी त्याने करवसुलीसाठी स्वतंत्र अधिकारी नेमले. या स्वतंत्र अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांवर मोठ्या प्रमाणात अत्याचार केले. म. फुले यांनी बाजीरावाचा भाऊ अमृतराव कशा प्रकारे अत्याचार करीत असे, याची माहिती दिली आहे. शिवाय सरंजामशाही व्यवस्थेत पेशव्यांचे व त्यांच्या सरंजामदारांचे स्वत:चे असे मुलूख होते. त्यांना काही गावे इनाम देण्यात आली होती.

थोडक्यात, जातिव्यवस्था, पंचायतसंस्था, बलुतेदारी आणि गावचा पाटील या चार खांबांवर ही सरंजामी व्यवस्था उभी होती. बाजीरावाच्या काळात त्यात अनेक भ्रष्ट गोष्टी शिरल्या. बाजीराव, दौलतराव, यशवंतराव हे सर्व आतून सडत चाललेल्या सरंजामशाहीचे प्रतिनिधी होते. लॉर्ड वेलस्ली आणि हेस्टिंग्ज यांच्या तयार सैन्यापुढे त्यांचा निभाव लागला नाही.

## इंग्रजी अंमल आणि रयतवारी व्यवस्था :

इंग्रजांचे राज्य महाराष्ट्रात स्थापन झाल्यानंतर इंग्रजांनी महाराष्ट्रात हळूहळू बदल घडवून आणावयास सुरुवात केली. शेतसारा त्या काळात उत्पन्नाचे मुख्य साधन होते. या शेतसाऱ्यात वाढ करण्यासाठी शेतीव्यवस्था बदलणे गरजेचे होते. नवीन सरकारने ठग, पेंढारी याचा पूर्ण बंदोस्त केल्यानंतर हे बदल घडवून आणले व भारतात त्यांनी कायदा आणि सुव्यवस्था स्थापन केली. त्यानंतर येथे त्यांनी इंग्रजी शिक्षण द्यावयास सुरुवात केली. तसे शिक्षण देणाऱ्या शाळा काही शहरात सुरू झाल्या. हे शिक्षण काही मोजक्या जागी आणि मोजक्या लोकांनाच देण्यात येणार होते. खालच्या समाजात वा शेतकरी समाजात शिक्षणाचा मोठा प्रसार करावा असे त्यांचे धोरण नव्हते. प्रथम वरच्या वर्गास शिक्षण द्यावे, नंतर ते कालांतराने हळूहळू खालच्या वर्गापर्यंत झिरपत जाईल असा त्यांचा या बाबतचा सिद्धान्त होता. त्यामुळे बदल फारच संथ गतीने झाले.

शेती क्षेत्रात त्यांनी नवे बदल घडवून आणले. उत्तर भारतात बंगाल प्रांतात त्यांनी कायमधाऱ्याची पद्धत लागू करून जमीनदारांचा एक नवा वर्ग निर्माण केला. पण दक्षिणेत मात्र त्यांनी जमीनदारीऐवजी रयतवारी पद्धत लागू केली. ही रयतवारी पद्धत महाराष्ट्रात लागू करणारे इंग्रज अधिकारी ब्रिटीश उदारमतवादाने – विशेषत: बेंथॅमच्या उपयुक्ततावादी विचारांनी – प्रभावित झालेले होते. ब्रिटीश अर्थशास्त्रातील काही नवे सिद्धान्त त्यांनी महाराष्ट्रास लागू केले. प्रिंगल या अधिकाऱ्यांच्या मते महाराष्ट्रातील शेतीव्यवस्थेचे जे सामुहिक स्वरूप आहे, त्यामुळेच खऱ्या अर्थाने ग्रामीण समाजाची प्रगती होत नाही. कारण स्वत: मेहनत करणाऱ्या शेतकऱ्यास त्या व्यवस्थेत फारसे प्रोत्साहन मिळत नाही.[१] म्हणून शेतकऱ्याच्या वैयक्तिक मालकीवर आधारलेली रयतवारी शेतीव्यवस्था सुरू केली पाहिजे. पाटील, पंचायत देशमुख, मामलेदार यांची शेतकऱ्यांच्या व्यवहारात जी दखलदारी होत आहे ती बंद केली पाहिजे. सरकार मध्यस्थ नसावा. या विचारांचा पाठपुरावा करीत इंग्रज अधिकाऱ्यांनी अव्वल इंग्रजीत महाराष्ट्रात रयतवारी पद्धती सुरू केली.

रयतवारी शेती पद्धतीची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे होती :

(१) शेतीची मालकी ते शेत कसणाऱ्या शेतकऱ्याकडे राहील. त्याला ती मालमत्ता विकण्याचा अधिकार असेल. त्याच्या जमिनीला भूमापन क्रमांक आणि त्याला मालकीचे कागदपत्र दिले जातील.

(२) शेतकरी त्याचा शेतसारा पैशाच्या रूपाने सरकारकडे जमा करील.

(३) शेतसारा तीस वर्षांत एकदाच जमिनीची प्रत वगैरेची पाहणी करून ठरविण्यात येईल. तो एकदा ठरल्यानंतर रोख रकमेने सरकाराकडे भरावा लागेल. साऱ्याची पाहणी दर तीस वर्षांनी पुन्हा करण्यात येईल.

(४) सर्व प्रकारच्या जमिनीवर – विशेषत: पडीक जमिनीवर – सरकारची मालकी असेल आणि शेतकऱ्याने शेतसारा जर वेळेवर भरला नाही तर त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्याचा अधिकार सरकारला देण्यात आला.

या व्यवस्थेमुळे ग्रामीण भागातील सामुहिक जीवनाची पद्धत मोडकळीस आली. इंग्रजांनी प्रत्येक गावाचा नकाशा तयार केला. जमिनीच्या तुकड्यांची मोजणी केली. त्यावर भूमापन क्रमांक दिला. शेतसारा व्यक्तिश: शेतकऱ्यावर जमिनीच्या आकारावर व मगदुरावर लादला. त्यामुळे महसुलाचे सामायिक जबाबदारीचे तत्त्व संपुष्टात आले. भांडवलशाहीतील खाजगी मालमत्तेचे तत्त्व शेती व्यवसायास लागू करण्यात आल्यामुळे एकूण व्यवस्थेत मोठेच मूलगामी बदल झाले.

केवळ सारावाढ करून पैसा मिळवणे हा इंग्रजांचा उद्देश असल्यामुळे व्यवस्थेचा शेतकऱ्यास फारसा उपयोग झाला नाही. उलट त्याची वाताहत झाली.

### महाराष्ट्रात शेती धंद्याची वाताहत :

इंग्रजानी शेती व्यवस्थेबरोबरच इतर क्षेत्रातही मोठे बदल घडवून आणले. त्यांनी मालमत्तेविषयी नवे कायदे आणले. नवे कोर्ट स्थापन केले. त्यामुळे कोर्ट फी आली. न्यायाधीश आले, वकील आले. खरेदी-विक्रीचे

नवे नियम झाले. शेतकरी आपली जमीन आता विकू शकत होता. त्यामुळे शेतकऱ्यांचा फायदा झाला नाही. मात्र सावकारशाहीचे फावले. त्यातच इंग्रजांनी चढेल दरात शेतसारा लादला. तो रोख पैशात भरण्याची त्याच्यावर सक्ती केली. तेवढा पैसा त्या काळात शेतकरी बचत करू शकत नव्हता.

१९ व्या शतकात हळूहळू भारतीय शेतीव्यवस्था जागतिक बाजारपेठेस जोडली गेली. बाजारपेठेत धान्याची उलाढाल करणारे कमिशन एजंट्स आणि आडत दुकानदार तयार झाले. जागतिक बाजारपेठेतील तेजीमंदीचा प्रभाव आता भारतीय बाजरपेठेवर पडू लागला. त्यामुळे पीक पद्धतीत बदल घडून आला. अमेरिकेतील यादवी युद्धाच्या काळात कापूस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांचा बराच फायदा झाला. पण यादवी युद्ध संपले. अमेरिकेतील शेती उत्पादन वाढू लागले. भारतीय मालाला उठाव राहिला नाही. त्यामुळे धान्यास मंदी आली. [२] भारतीय शेतीचे व्यापारीकरण झाले.

पैशावर आधारलेल्या समाजव्यवस्थेत पैशास, नाण्यास महत्त्वाचे स्थान असते. शेतकरी आपल्या जवळचे अन्नधान्य विकून पैसा मिळवीत असतो. पण १८७० नंतर शेतमालाचे भाव गडगडले. १८७१-७२ साली ज्वारीचा भाव एका रुपयास बावीस शेर होता. पण १८७४-७५ साली ज्वारीचा भाव एका रुपयास ४५ शेर व बाजरीचा भाव एका एका रुपयास ४० शेर इतके खाली आले. त्यामुळे शेतकऱ्याच्या रोकड उत्पन्नात घट झाली. पण १८६६ साली इंग्रजांनी जमाबंदी करून शेतसाऱ्यात जवळ जवळ शेकडा ५० टक्के वाढ केली होती. कारण १८६५-६६ साली बाजारात ज्वारीचा भाव एका रुपयास १८ शेर होता. १८३६-३७ साली तो एका रुपयास ४३ शेर होता. इंग्रज अधिकाऱ्यांच्या मते शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढलेले होते. पण चार-पाच वर्षातच ही सारा आकारणी किती ठिसूळ पायावर उभी होती हे दिसून आले. [३]

वाढीव सारा आकारणीबरोबरच सावकारशाहीचे नवे संकट इंग्रजांनी या देशात निर्माण केले. पूर्वीच्या काळात सावकाराचे हात दामदुप्पट रिवाजामुळे व शेतीच्या हस्तांतरण बंदीमुळे बांधलेले होते. त्याला राज्यसभेच्या मदतीने शेतकऱ्याचे शेत हिरावून घेता येत नसे. पण इंग्रजी अंमलाखाली परिस्थिती बदलली. सावकाराने जमीन लिहून घेऊन कर्ज

घ्यावयास सुरुवात केली. त्यांनी चक्रवाढ दराने व्याज लादावयास सुरुवात केली. पण शेतमालाचे भाव ढासळल्यामुळे घेतलेले कर्ज परत करणे शेतकऱ्यांस शक्य झाले नाही. सावकारांनी सिव्हील कोर्टात शेतकऱ्यांवर फिर्यादी केल्या. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनीचे हस्तांतरण व्हावयास सुरुवात झाली. एकट्या पुणे जिल्ह्यात इ.स. १८६८ पासून १८७३ पर्यंतच्या सहा वर्षांत अशा प्रकारच्या खटल्यांची संख्या सुमारे १२,००० वरून २८,००० पर्यंत वाढली. कोर्टाचे कामकाज तालुक्याच्या ठिकाणी चाले. त्यामुळे वारंवार तारखा लागत. शेतीची कामे सोडून शेतकऱ्यास कोर्टात जावे लागे. वकिलाची भरमसाठ फी द्यावी लागे.

इंग्रजी राजवटीत नव्या कायद्यामुळे व न्यायव्यवस्थेमुळे शेतकऱ्याचे नुकसान झाले व सावकारांचे हात बळकट झाले. त्यामुळे हजारो एकर जमीन सावकाराकडे हस्तांतरित झाली. सावकारात मारवाडी, गुजर व ब्राह्मण या जातीतील लोक प्रमुख होते. अनेक शेतकरी कूळ म्हणून काम करू लागले. स्वत:च्या शेतात ते शेतमजूर झाले. शहरांत फारसा औद्योगिक विकास झालेला नसल्यामुळे शहराकडे जाण्याचा मार्ग बंद झालेला होता. त्यामुळे शेतकऱ्यांना अतिशय त्रास झाला. कायद्याची प्रक्रिया त्यांना कळत नव्हती. यात त्यांचा पैसा व शेत यांचे समर्पण होत होते. त्यामुळे चाळीस चाळीस एकरांचे मालक असणारे शेतकरी सावकारांच्या पकडीत सापडत. केवळ अडीच-तीनशे रुपयांचे कर्ज परत न करू शकल्यामुळे त्यांना आपली शेती गमवावी लागली.

साम्राज्यशाहीने अशा प्रकारे शेतकऱ्यांचे भयानक शोषण केले. भारतातील कच्च्या मालाची निर्यात करून भारतात आपल्या कारखान्यातील पक्का माल विकावयास सुरुवात केली. त्यांनी भारतातील देशी उद्योगधंदे व हस्तोद्योग नष्ट केले आणि आपल्या युरोपीय नोकरास लठ्ठ पगाराच्या नोकऱ्या दिल्या. इंग्रजांनी कालवे बांधण्यावर फारसा खर्च केला नाही. सरंजामशाहीत गावोगाव कालवे व तळी बांधली जात. पण त्याचे बांधण्याचे व दुरुस्तीचे काम करणाऱ्या संस्था मोडकळीस आल्या. शेतीचे उत्पादन फारसे वाढले नाही. पण शेतीवर अवलंबून राहणाऱ्या लोकांची संख्या मात्र

वाढली. मराठेशाहीत लाखोंच्या संख्येने लोक मुलुखगिरीस बाहेर जात. पण इंग्रजी अंमलात ते काम राहिले नाही. शेतीकडे दुर्लक्ष केल्यामुळे देशात मोठमोठे दुष्काळ पडले. या दुष्काळात लाखो लोक मरण पावले. १८७७-७८ साली मुंबई प्रांताच्या दक्षिण भागात मोठा दुष्काळ पडला. या दुष्काळात पाच-सहा लाख लोक तडफडून मरण पावले. पुढील तक्त्यावरून भारतात दुष्काळामुळे मरणाऱ्या लोकांची संख्या आपल्या लक्षात येईल.

| वर्ष | मृत्युमुखी पडलेल्या लोकांची संख्या |
|---|---|
| १८००-२५ | १,००,००० |
| १८२५-५० | ४०,००० |
| १८५०-७५ | ५,००,००० |
| १८७५-१९०० | १५,००,००० |

एवढ्या मोठ्या प्रमाणात माणसे मरण्याचे कारण म्हणजे दुष्काळाबरोबरच ब्रिटिशांचे अन्नधान्याच्या निर्यातीचे धोरण हे होते. या काळात अन्नावाचून लाखो माणसे मरत असताना सरकारने मोठ्या प्रमाणात गहू आणि भात यांची निर्यात केली. निर्यातीचे प्रमाण पुढील तक्त्यावरून लक्षात येईल.

**गव्हाची १८६९-९५ पर्यंतची निर्यात (पौंडामध्ये)[६]**

| | |
|---|---|
| १८६९ | २,७५,४८१ |
| १८७३-७४ | १७,५५,९५४ |
| १८८२-८३ | १,४१,९३,७६३ |
| १८९१-९२ | ३,२७,४०,००० |

१८७७ साली गहू व भात यांची एकूण निर्यात ७,९०,००० पौंड होती. १८७७-७८ च्या दुष्काळात लोकांची क्रयशक्तीच संपुष्टात आली. वारंवार पडणाऱ्या या दुष्काळामुळे लाखो माणसे व गुरेढोरे मेली. शेतीधंद्याची वाताहत झाली.

## शेतकऱ्यांचे व आदिवासींचे उठाव :

इंग्रजांच्या या धोरणावरून शेतकऱ्यांनी व आदिवासींनी त्यांच्याविरुद्ध

अव्वल इंग्रजीत अनेक सशस्त्र उठाव केले. आदिवासी लोकांच्या जंगलावर इंग्रजांनी ताबा घेतला. फॉरेस्ट खाते निर्मिले. त्यामुळे आदिवासी निराधार झाले. खानदेशात व इतरत्र भिल्लांचे बंड झाले. लोकांनी दंगे केले. १८३२ साली ओल्या दुष्काळामुळे हवालदिल झालेल्या पुण्यातील शेतकऱ्यांनी दंगे केले. १८५२ साली खानदेशात सर्व्हे सेटलमेंटच्या विरोधात शेतकऱ्यांनी उठाव केले. खानदेशात १८५० पर्यंत भिल्लांचे दंगे होत राहिले. उत्तर कोकणात १८३९-४६ या काळात कोळी लोकांनी इंग्रज सरकारच्या विरुद्ध बंड पुकारले. हे बंड इंग्रज सरकारने निर्दयपणे चिरडून टाकले. त्यांच्या अनेक पुढाऱ्यांना फासावर लटकवण्यात आले. १८४६ साली कोळी बंडखोरांनी माळसेज व नाना घाट ताब्यात घेतले. नाशिक व नगर जिल्ह्यात त्याचे लोण पसरले. त्यांनी श्रीमंत मारवाडी सावकारांची घरे लुटली. त्यांची नाके कापली.[७]

१८३९ साली शेतकऱ्यांच्या पाठिंब्याने धारराव पवारांचे बंड झाले. इस्लामपूरच्या आंधळ्या नरसिंगरावाचेही असेच बंड झाले. नरसिंगरावाने खजिने लुटले व जमीन शेतकऱ्यांत वाटून टाकली. लवकरच सरकारने त्याचा बंदोबस्त केला. पुणे जिल्ह्यात रामोशांनी इंग्रजांना 'दे माय धरणी ठाय' करून सोडले होते. उमाजी नाईक आणि त्याच्या मुलास शेतकऱ्यांचा पाठिंबा होता. पण इंग्रजांनी हे सारे उठाव क्रूरपणे चिरडून टाकले. अनेकांना फासावर लटकावले.

अव्वल इंग्रजी अमदानीत शेतकऱ्यांवर व आदिवासींवर इंग्रजांनी जे अन्याय केले, त्यामुळे त्यांनी त्यांच्याविरुद्ध सशस्त्र उठाव केला. हे उठाव इंग्रजांच्या जंगलविषयक धोरणाविरुद्ध होते. रयतवारी सारा आकारणीविरुद्ध होते. पुढे १८७३-७४ साली दुष्काळामुळे पिडलेल्या आणि सावकारांनी गांजलेल्या शेतकऱ्यांनी पुणे व नगर जिल्ह्यात उठाव केले. सावकारांची घरे लुटण्यात आली. कागदपत्रे जाळण्यात आली. शेतकऱ्यांतील हा असंतोष सरकारच्या लक्षात आला. दक्षिणेत झालेल्या दंग्यांची चौकशी करण्यासाठी त्यांनी एक समिती नेमली. त्या समितीने सावकारशाहीविरुद्ध काही उपाययोजना सुचविल्या. इंग्रजांविरुद्ध लोकांचे उठाव त्यानंतर हळूहळू कमी होत गेले.

**महाराष्ट्रातील नवे बदल :**

त्या काळात महाराष्ट्रात हळूहळू नवे बदल होत होते. महाराष्ट्रातील शेतकरी समाजात वेगवेगळे थर होते. त्याचप्रमाणे नवा सुशिक्षित मध्यमवर्ग जन्म घेत होता. नव्या शिक्षणाचा लाभ सुरुवातीच्या काळात ब्राह्मण वर्गाने घेतला. पण इतर जातीतील काही मोजक्या लोकांनाही नव्या इंग्रजी शिक्षणाचा लाभ झाला. पण ब्राह्मण वर्गाने इंग्रजी शिक्षणाचा लाभ घेऊन सरकारातील मोक्याच्या जागा बळकावल्या. त्यांनी सरकारला सहकार्य केले. संपूर्ण समाजावर त्यांची मक्तेदारी स्थापन झाली. इतर जातीतूनही अगदी लहान प्रमाणात मध्यमवर्ग निर्माण होत होता. कंत्राटी धंद्यासारख्या धंद्यात हा वर्ग जम बसवीत होता. पण सगळीकडे खालच्या स्तरावर ब्राह्मणांचे वर्चस्व होते. इंग्रजी राज्यातील या ब्राह्मणी वर्चस्वावर हल्ला करावयास याच वर्गाने सुरुवात केली. इतर क्षेत्रात वर आलेल्या तरुणांनाही उच्च वर्णीय मक्तेदारीचा त्रास सहन करावा लागला. त्यामुळे जोतीबा फुल्यांच्या सत्यशोधक समाजाला ब्राह्मणेतर जातीतील त्या काळातील सर्व थोर व्यक्तींनी पाठिंबा दिलेला आपणास दिसतो.

डॉ. रवींद्रकुमार यांच्या मते त्या काळात महाराष्ट्रातील शेतकरी समूह प्रामुख्याने तीन भागात विभागलेला होता. त्यातील शेकडा १० टक्के शेतकरी हे सुखवस्तू होते आणि त्यांच्याजवळ चांगल्या मगदुराच्या जास्त जमिनी होत्या. त्यांच्याजवळ स्वत:चा बैल, बारदाणा आणि शेतीचा सरंजाम होता. शेतकरी समूहाच्या दुसऱ्या थरात सुमारे ४० टक्के शेतकऱ्यांचा समावेश होत होता. त्यांच्याजवळ मध्यम दर्जाची २० ते ७० एकरपर्यंत जमीन होती. हे सारे कोरडवाहू शेती करणारे शेतकरी होते. हे शेतकरी मोठ्या प्रमाणात कर्जबाजारी झालेले होते. अज्ञान व रोगराईने पिडलेले होते. एक दोन हंगाम खराब गेले की त्यांची परिस्थिती अतिशय खराब बनत असे. सावकारशाहीने हा वर्ग पुरता नाडला होता. उरलेले ५० टक्के शेतकरी १०-१५ एकर जमीन असणारे छोटे शेतकरी होते.[८] त्यांची अवस्था मोठी दयनीय होती. त्यांना कोणी कर्ज देत नसे. त्यांच्याजवळ बैल, बारदाणाही नसे. त्यातच भाऊ हिस्से होऊन शेतीचे तुकडे झाले की ते जास्तच गरीब

बनत. ते शेतमजूर बनत. दुष्काळात काढलेल्या कामावर खडी फोडण्यासाठी या वर्गातील शेतकरी मोठ्या प्रमाणावर जात असे. या शेतकऱ्यांतील तीन घरांपैकी ज्याच्या शेताला बारमाही पाणी मिळत होते, तोच शेतकरी थोडासा सुखी होता. बाकी शेतकरी सरकार, सावकार, व्यापारी, दलाल आणि नोकरशाही यांनी पिडलेले होते.

या काळात नव्या राजकारणाचा व समाजकारणाचा हळूहळू उदय होत होता. या काळातील राजकीय व सामाजिक पुढाऱ्यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न हाती घेतले. या प्रश्नांकडे पाहण्याचे त्याकाळी दोन प्रवाह होते. एक प्रवाह होता पुणे सार्वजनिक सभा आणि न्यायमूर्ती रानडे यांचा आणि दुसरा प्रवाह होता महात्मा जोतीराव फुले आणि सत्यशोधक समाज यांचा. दोघांचे शेतकऱ्यांकडे पाहण्याचे दृष्टिकोन वेगवेगळे होते.

### शेतकरी प्रश्न – दोन दृष्टिकोन :

शेतकऱ्यांची वासाहतिक समाज व्यवस्थेत वाताहत झाली. या प्रश्नांवर 'पुणे सार्वजनिक सभा' आणि 'सत्यशोधक समाज' यांनी वेगवेगळे विचार मांडले. पुणे सार्वजनिक सभेचे प्रमुख श्री. जी. व्ही. जोशी हे होते. न्यायमूर्ती रानडे हे त्यांचे जवळचे सहकारी होते. या सभेचे बहुतेक सदस्य ब्राह्मण होते. दुष्काळ व शेतकऱ्यांची दैन्यावस्था यावर सभेने खोलवर विचार केला होता. सार्वजनिक सभेने नव्या जमाबंदीस विरोध केला. सारावाढीविरुद्ध काही भागात शेतकऱ्यांनी चळवळ सुरू केली. रानडे आणि जोशी यांचे शेतीविषयक विचार भांडवली अर्थशास्त्रावर आधारलेले होते. त्यांना भारतात भांडवली शेतीचा विकास अभिप्रेत होता. भारतातील शेती डोईजड शेतसारा, शेती कसण्याच्या मागास पद्धती, शेती सुधारणेची प्रेरणा नसणे आणि शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा यामुळे मागास राहिली आहे. त्यासाठी रानड्यांनी अशी सूचना केली की, शेतकऱ्यांच्या हातात यांत्रिक अवजारे, भांडवल देण्यात यावे. शेतीचा खऱ्या अर्थाने विकास करावयाचा असेल तर बऱ्यापैकी जमीन असणारा, भांडवली पद्धतीने, यांत्रिक अवजारांच्या साह्याने शेती करणारा शेतकऱ्यांचा नवा वर्ग निर्माण झाला पाहिजे.

शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी सहकारी बँका व शेती बँका काढाव्यात. सभेच्या मते मराठी शेतकरी लग्नकार्यात पैशाची उधळपट्टी करतो. त्याच्या जमीन कसण्याच्या पद्धती मागास आहेत. पण गेल्या तीस वर्षांत शेतकऱ्यांची परिस्थिती हळूहळू सुधारत आहे. सार्वजनिक सभेने शेतकऱ्यांचे प्रश्न हाती घेतले. काही प्रमाणात असंतुष्ट कुणब्यांना पाठिंबा दिला. परंतु शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने नेतृत्व देण्याचे कार्य सभेने केले नाही. डॉ. कुमार यांच्या मते त्यांनी हे काम न केल्यामुळे सार्वजनिक सभेच्या पुढाऱ्यांच्या हातामध्ये महाराष्ट्राचे पुढारीपण आले नाही.[१]

या विरुद्धचा दुसरा दृष्टिकोन म. जोतीराव फुले यांचा होता. फुल्यांनी आपले विचार त्यांच्या निरनिराळ्या पुस्तकांतून–विशेषत: 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथातून–मांडले. त्यांनी ब्राह्मणी वर्चस्वाविरुद्ध बंड पुकारले. त्यांच्या मताप्रमाणे समाजावरचे ब्राह्मणांचे वर्चस्व हे सर्वंकष वर्चस्व आहे, त्यांनी शेतकऱ्यांवर लादलेली गुलामगिरी सर्वांगीण आहे. त्या गुलामगिरीतून त्यांना शेतकऱ्याला सोडवायचा होता. रानडे आणि जी.व्ही. जोशी यांचा भांडवली विकासाचा मार्ग त्यांना मान्य नव्हता. त्यांना सर्व कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांचे लोकसत्तात्मक राज्य स्थापन करायचे होते. त्यासाठी शेतकरी शिकला पाहिजे. शहाणा झाला पाहिजे. आपल्या हलाखीची कारणमीमांसा त्याला करता आली पाहिजे, असे त्यांचे मत होते. त्यासाठी शेतकऱ्यांची सर्वांगीण मुक्ती झाली पाहिजे. धर्म, संस्कृती, जात इत्यादी बाबतीत त्याचे जे शोषण चालू आहे त्यातून त्यास मुक्ती मिळावी. शेतकरी खऱ्या अर्थाने स्वतंत्र व्हावा, खरी लोकशाही काय असते, खरा धर्म कसा असतो, आदर्श राज्य कसे असते याचे त्याला ज्ञान व्हावे असे जोतीरावांचे मत होते. केवळ शेतीत जुजबी सुधारणा करून, त्याला पैशाची मदत करून तो स्वतंत्र व सुखी होणार नाही, तर त्याला सर्वार्थाने व सर्वांगाने मुक्त केले पाहिजे, असा मोलाचा विचार जोतीराव फुले यांनी मांडला.

वासाहतिक महाराष्ट्रातील शेतकरी समूह अशा प्रकारे स्वकीयांकडून व परकीयांकडून नाडला जात होता. त्यावेळी जोतीरावांनी या अन्यायाविरुद्ध लढा पुकारला आणि आयुष्यभर त्यांच्या प्रबोधनासाठी प्रयत्न केले.

❒❒❒

## प्रकरण दुसरे

# म. जोतीबा फुले आणि शेतकरी चळवळ

म. जोतीबा फुले यांच्या काळात भारतातील—विशेषत: महाराष्ट्रातील – शेतकऱ्यांची परिस्थिती कशी होती, याचे थोडक्यात विवेचन आपण मागील प्रकरणात केले. प्रस्तुत प्रकरणात म. फुले यांनी त्यांच्या हयातीमध्ये शेतकऱ्यांच्या जागृतीसाठी कोणते प्रयत्न केले, कोणत्या चळवळी केल्या याची आपण चर्चा करणार आहोत. म. फुले आणि तत्कालीन विचारवंत यांच्यातील मुख्य फरक म्हणजे सार्वजनिक सभेच्या पुढाऱ्यांसारखे ते शेतीपासून फारसे दूर नव्हते. त्यांना शेतीचा धंदा आणि शेतकरी याबाबत सर्व माहिती होती. त्यांचे त्याविषयीचे ज्ञान पुस्तकी नव्हते.

जोतीबा फुले यांचा जन्म इ.स. १८२७ साली झाला. ते एक वर्षाचे असताना त्यांची आई वारली. वयाच्या सातव्या वर्षी त्यांच्या वडिलांनी त्यांना शाळेत घातले. काही काळ काही ब्राह्मणांच्या सल्ल्यावरून गोविंदराव फुले यांनी त्यांना शाळेतून काढले. पण पुढे गफार मुन्शी बेग आणि लेजिट साहेब यांच्या मध्यस्थीने त्यांची शाळा सुरू झाली. या काळात त्यांनी खूप वाचन केले. १८४८ साली ते एका ब्राह्मण मित्राच्या लग्नास गेले असता त्यांचा तिथे जातीवरून अपमान झाला. त्यामुळे त्यांना वस्तुस्थितीची जाणीव झाली. स्त्री, शूद्र आणि अतिशूद्र हे गुलामगिरीचे जीवन जगत आहेत, इंग्रजी अंमलात त्यांना शिक्षणाची कमीतकमी संधी मिळत आहे. त्यांच्या विकासाचा शिक्षण हाच एक मार्ग आहे हे लक्षात येताच जोतीरावांनी बुधवारपेठेत चिपळूणकरांच्या वाड्यात मुलींची शाळा काढली. १८५२ साली म्हणजे वयाच्या २५व्या वर्षी त्यांनी अस्पृश्यांसाठी नाना पेठेत शाळा काढली. १८६४ साली त्यांनी पुनर्विवाह घडवून आणला. त्याच वर्षी त्यांनी आपल्याच घरात अनाथ व पाय वाकडा पडलेल्या विधवांसाठी ‘प्रसूतीगृह’ आणि ‘बालहत्या प्रतिबंधक गृह’ काढले. ब्राह्मण विधवांच्या केशवपनास विरोध करून त्यांनी पुण्यातील न्हाव्यांचा संप घडवून आणला. १८६८ साली त्यांनी घरचा हौद अस्पृश्यांसाठी खुला केला. १८७३ साली त्यांनी

पुरोहितांवाचून लग्न लावले आणि 'सत्यशोधक समाजा'ची स्थापना केली. आपल्या विचारांचा प्रसार व प्रचार करण्यासाठी त्यांनी या काळात अनेक पुस्तके लिहिली. गिरणी मजुरांसाठी म. फुले यांचे सहकारी नारायण मेघाजी लोखंडे यांनी गिरणी कामगारांची पहिली कामगार युनियन उभारली. त्यांनी 'दीनबंधू' नावाचे वर्तमानपत्रही सुरू केले.

इ.स. १८७६-८२ या काळात जोतीराव फुले नगरपालिकेचे सभासद होते. त्यांनी या काळात अनेक लोकोपयोगी कामे केली. इंग्रजांचे शिक्षणविषयक धोरण चूक असून सरकारने बारा वर्षांखालील सर्व मुलामुलींना मोफत शिक्षण द्यावे व ते सक्तीचे करावे असा विचार त्यांनी मांडला. १८८३ साली त्यांनी त्यांचा 'शेतकऱ्याचा आसूड' हा ग्रंथ लिहिला. १९ मे १८८८ रोजी त्यांना मुंबई मुक्कामी 'महात्मा' ही पदवी देण्यात आली. त्याच वर्षी त्यांना अर्धांगवायूचा झटका आला. पण त्यातून ते बचावले. त्यांचे उजवे अंग निकामी झाले. पण त्यानंतर ते फार दिवस जगले नाहीत.

जोतीराव फुले यांच्याबरोबर त्यांचे सहकारी लोखंडे आणि भालेकर यांनी काम केले. १८८९ साली मुंबईत 'ऑल इंडिया काँग्रेस'चे अधिवेशन भरले होते. या काँग्रेसात भालेकरांनी प्रवेशद्वारासमोर शेतकऱ्याचा पुतळा उभा केला. त्यांनी काँग्रेसच्या प्रतिनिधींना सुनावले की, ''जोवर शेतकऱ्यांचा प्रतिनिधी तुमच्यात नाही, तोवर देशाचे पुढारीपण करावयास तुम्ही अपात्र आहात. वीस कोटी शेतकऱ्यांचा प्रतिनिधी जोपर्यंत काँग्रेसमध्ये सामील होत नाही. तोपर्यंत तिला राष्ट्रीय सभा म्हणता येणार नाही, असे फुले-भालेकर यांचे मत होते.

सुरुवातीच्या काळात जोतीरावांचे लक्ष शिक्षण व समाजसुधारणेकडे लागलेले होते. पुढे त्यांनी दगड पुरविण्याचे कंत्राट घेतले आणि त्यावेळी त्यांना शेतकरी व कामगार यांच्या शोषणाची व सरकारी नोकर आणि युरोपीय अधिकारी यांची खरीखुरी माहिती झाली. इंजिनियरिंग खात्यातील भ्रष्टाचार त्यांच्या लक्षात आला. त्यानंतर व त्यापूर्वीही जोतीरावांनी या विषयावर लिखाण करावयास सुरुवात केली. 'सत्यशोधक समाज' स्थापन

झाल्यानंतर त्यांनी शेतकऱ्यांचा प्रश्न महत्त्वाचा समजून त्या विषयावर व्याख्याने द्यावयास सुरुवात केली. 'सत्यशोधक समाजा'तर्फे भरविण्यात आलेल्या सभेत फुल्यांनी 'स्वदेशीय म्हणविणाऱ्या राजापेक्षा परदेशी राजाकडून कालव्याच्या संबंधीचे शूद्र लोकांचा किती फायदा झाला?' या विषयावर निबंध वाचला. त्यानंतर 'सतत दुष्काळ का पडतात?', 'शूद्रच त्यात बळी कां पडतात?', 'दुष्काळ टाळण्यासाठी उपाय काय योजावे?' या विषयांवर निबंधस्पर्धा आयोजित करण्यात आली. १८७७ साली दुष्काळात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या मुलांसाठी बालाश्रम काढण्यात आला. खडकवासला कालवा झाल्यानंतर सुरुवातीच्या काळात शेतकरी पाण्याचा व्यवस्थित वापर करीत नव्हते. पण त्यांना शेती कशी करावी हे समजावून सांगण्यासाठी त्या भागात स्वत: जोतीरावांनी जमीन घेतली. नव्या पद्धतीने शेती करून दाखविली.[१०]

इ.स. १८८३ साली त्यांनी 'शेतकऱ्याचा आसूड' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथाची काही प्रकरणे त्यांनी बडोद्याचे महाराज श्री. सयाजीराव गायकवाड यांना वाचून दाखविली. महाराजांनी तो ग्रंथ लक्षपूर्वक ऐकला. सार्वजनिक सभा खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांचे हित साधू शकत नाही, म्हणून त्यांनी 'दीनबंधू सार्वजनिक सभा' स्थापन केली. शेतकऱ्यांच्यामध्ये जागृती निर्माण करण्यासाठी जोतीरावांनी गावोगावी सभा घ्यावयास सुरुवात केली. ते खेडोपाडी जाऊन सभा घेत होते. साधासुधा शेतकरी हा सत्यशोधक समाजाचा कार्यकर्ता होता. या सभांसाठी एखाद्या देवळाचा मंडप किंवा शेतकऱ्याच्या शेतीतील मळणीची जागाही चालत असे. १८८२ साली जोतीरावांनी मुंबईत 'हिंदी शेतकऱ्यांची स्थिती' या विषयावर व्याख्यान दिले. या व्याख्यानाला सुमारे चार हजार लोक उपस्थित होते. या काळात 'शेतकऱ्याचा आसूड' या ग्रंथाचे गावोगावी सार्वजनिक वाचन झाले. जोतीरावांचा विचार गावोगावी पसरू लागला.

ओतुर या गावी भाऊ कोंडाजी पाटील यांनी फुले यांना बोलावले. तेथे त्यांची भाषणे झाली. त्यांची भाषणे ऐकावयास शेकडो लोक जमू लागले. जुन्नर व आसपासच्या भागातही त्यांनी प्रचाराचा धडाका उडवला.

शेतकऱ्यांचे दैन्य, त्यांचे विद्येच्या क्षेत्रातील मागासलेपण, त्यांची धार्मिक व सांस्कृतिक गुलामगिरी आणि समाजावर असणारे ब्राह्मणांचे सर्वंकष वर्चस्व यावर त्यांनी झोड उठविली. जुलै १८८४ मध्ये भरलेल्या सभेस सुमारे दोन ते तीन हजार लोक जमले होते. या नव्या चळवळीचा कसा परिणाम होत होता याचे फुल्यांनी वर्णन केले आहे. ते लिहितात –

*ओतूर गावी भाऊ भडकला ।*
*जुन्नरकर शेट्या धडकला ।*
*आर्यभट त्यामध्ये फुल्यास पाहती ।*
*पत्रांमध्ये हाय हाय करती ।*

या सर्व चळवळीचा परिणाम म्हणून १८८५ साली जुन्नर भागात शेतकऱ्यांचा असंतोष वाढला. त्यांनी सरकारकडे निवेदन देऊन अशी मागणी केली की, सावकार व जमीनदार यांपासून आपणास संरक्षण मिळावे. कारणं सावकार, जमीनदार, वकील, न्यायाधीश ही मंडळी एकाच जातीतील होती. त्यांच्या एकजुटीमुळे व कारवायांमुळे कुणब्यांचे जिणे हराम झाले होते. त्यामुळे त्या भागातील शेतकऱ्यांनी बहिष्काराचा मार्ग स्वीकारला. एक वर्ष त्यांनी सावकारांच्या व जमीनदारांच्या जमिनी कसावयास नकार दिला. सरकारकडे त्यांनी तक्रार निवारण करण्याची मागणी केली. चार-पाच हजार शेतकऱ्यांच्या सह्यांचा अर्ज सरकारकडे पाठविण्यात आला. जोतीरावांनी यात पुढाकार घेतला. या बहिष्कारामुळे शेवटी शेतकरी, सावकार, जमीनदार व सरकार यांच्यात तडजोड झाली. व्याजाचा व जमिनीच्या लागवडीचा दर कमी करण्यात आला. बहिष्काराचे हत्यार किती अचूक, गुणकारी व जालीम आहे हे जोतीरावांनी सर्वांना यावेळी दाखवून दिले.[११]

'सत्यशोधक समाजा'चा विचार सगळीकडे पसरू लागला. ब्राह्मणेतर समाजातली डॉ. घोले, डॉ. लाड, म्हस्के यांच्यासारखे लोक जोतीरावांना पाठिंबा देऊ लागले. १८८४ साली जोतीराव बडोद्याला गेले. तेथे त्यांनी 'शेतीसुधारणा' या विषयावर व्याख्याने दिली. त्यांनी सयाजीरावांना उद्देशपत्र लिहून सांगितले की, शूद्रांना ब्राह्मणांनी विद्येपासून वंचित करून त्यांची दीनवाणी अवस्था केली आहे. म्हणून शूद्रांना विद्या द्या, आळशी

आणि ऐतखाऊ भटांना हाकलून लावा. ते लिहितात –

*वसुलाचा पैसा खर्चून खिचडी ऐद्यांना ।*
*कष्टकरी शेतीत खाती चटणी भाकरीना ।।*
*वर्षासने भटजी नेती खुल्ला खजिना ।*
*शेतकरी कष्ट करुनी करती भरणा ।*
*शेतातील बैल मरती औती ।*
*गोप्रदाने भटजी खाती सोयरी कां माना!*
*पक्वान्नांची नित्य भोजने आर्य भटांना ।*
*जन्मांतरी शेतकऱ्यांना तुकडा मिळेना ।।*
*हात जोडून भटास देती रोख दक्षिणा ।*
*सार्वजनिक सूट नाही कधी कुणब्यांना ।।*
*नाचे पोरे भटा भिक्षुका शालजोड्या दाना ।*
*उत्तम शेती करितो त्याला बक्षिस कां द्याना?*

'अक्षरशून्य शूद्रांचे दयानिधी व्हा' अशी त्यांनी सयाजीरावांना विनंती केली. या पत्राचा महाराजांवर प्रभाव पडला आणि संस्थानातील ब्राह्मणांना मोफत खिचडी (डाळ व तांदूळ) देण्याची प्रथा त्यांनी बंद केली.

हरी रावजी चिपळूणकर यांनी ड्यूक ऑफ कॅनाटला मेजवानीसाठी आमंत्रित केले. जोतीरावांना त्याचे निमंत्रण होते. या समारंभात ते शेतकऱ्याच्या वेशात आले. ड्यूकला त्यांनी शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेची माहिती दिली. जोतीरावांचे सहकारी भालेकर यांनी आपल्या 'दीनमित्र' या पत्रात एक व्यंगचित्र प्रकाशित केले होते. त्या चित्रात राष्ट्रीयगाडा मराठे, माळी, कुणबी, महार, मांग, भिल्ल ओढत आहेत. त्यात युरोपीय व ब्राह्मणादी लोक बसलेले आहेत. वाट उंचवट्याची असूनही आत बसलेले खाली उतरत नाहीत. युरोपीयांशी जास्त जागा मिळावी म्हणून ब्राह्मण-पारशी भांडत आहेत. पण गाडा ओढणाऱ्या लोकांस पोटभर अन्न नाही. त्यांची दुर्दशा या चित्रात दाखविली होती.

शेतकऱ्यांचे कल्याण कसे करावे याचा जोतीरावांना ध्यास लागलेला होता. इ.स. १८८७ साली त्यांनी एक मोठे चित्र काढले. आपल्या देशातील



INSTITUT ... 124303

निरनिराळ्या समाजांची स्थिती ताडून पाहण्यासाठी त्यांनी एक नकाशा काढला. या नकाशावर निरनिराळ्या वर्गाच्या सुधारणेची नंबरवारी एका झाडाच्या रूपाने त्यांनी आखली. या झाडाच्या शेंड्यावर पारशी समाज नंबर १ वर दाखविला असून दुसऱ्या नंबरवर ब्राह्मण वर्ग आहे. हे सारे सुधारणेचे झाड शेतकऱ्यांच्या टाळक्यावर उगवलेले दाखवून त्याखाली शेतकऱ्यांच्या बोकांडी करांचे ओझे लादलेले आहे. तो शेतकरी बोजा जड झाल्यामुळे अशक्त, वाकलेला आणि भांबावलेला दाखविला आहे. हे चित्र आज उपलब्ध नाही. पण या प्रश्नावर फुले कशा पद्धतीने विचार करीत होते हे यावरून दिसून येते.[१२]

जोतीराव फुले यांनी कष्टकरी, शेतकरी यांचा प्रश्न जगासमोर मांडला. त्यांना विद्या मिळावी, ज्ञान मिळावे, त्यांना कष्टाप्रमाणे पोटभर खायला मिळावे, यासाठी त्यांनी प्रयत्न केले. शेतकऱ्यांचे सर्वांगीण शोषण कशा प्रकारे होत आहे, या शोषणातून त्यांची मुक्ती कोणत्या मार्गाने होईल याबाबतही त्यांनी आपले विचार मांडले. जोतीरावांच्या क्रांतिकारक विचारांचा परामर्श आपण पुढील प्रकरणात घेणार आहोत.

❐❐❐

## प्रकरण तिसरे

# म. जोतीराव फुले यांचे शेतकरी प्रश्नांविषयीचे विचार

म. जोतीराव फुले यांनी शेतकऱ्यांचा प्रश्न केवळ आर्थिक दृष्टिकोनातूनच तपासला नाही. त्यांच्या हे लक्षात आले होते की, शेतकऱ्यांना जर स्वातंत्र्य मिळवायचे असेल तर त्या प्रश्नाच्या सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक बाजूही आपण तपासल्या पाहिजेत. कारण तो वर्ग ब्राह्मणांनी सर्व बाजूंनी शोषिलेला आणि नाडलेला आहे. शेतकऱ्याला जोपर्यंत आत्मस्थितीचे खरेखुरे ज्ञान होत नाही, आपण कोण आहोत हे जोपर्यंत त्यांच्या पूर्णपणे लक्षात येत नाही तोपर्यंत त्यांचे शोषण चालूच राहणार आहे. म्हणून जोतीरावांनी शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार केला.

### म. फुले यांची धेय्यदृष्टी :

जोतीरावांच्या मते ब्राह्मण लोकांनी हजारो वर्षांपूर्वी शूद्रांना गुलाम केले. सुरुवातीच्या काळात माणूस अगदीच स्वतंत्र होता. निसर्गक्रमात तो हळूहळू स्थिर झाला. त्याने कुटुंब, गाव आणि राज्य या संस्था स्थापन केल्या. समाजात श्रमविभागणी झाली. सुरुवातीच्या काळात ९६ कुळींची लोकसत्ताक राजवट सुरू झाली. पण हळूहळू हे सर्व लोकप्रतिनिधी राजे झाले. आर्यांनी शूद्रांचा पराभव करून त्यांचे राज्य हडप केले. याच इतिहास-क्रमात त्यांनी वामनाच्या मदतीने कपट करून बळीराजाचे राज्य गिळंकृत केले. बळीराजा हा शेतकऱ्यांचा राजा होता. त्याची आठवण अजून शेतकऱ्यांना होते. म्हणून शेतकऱ्यांच्या बायका दिवाळीच्या वेळी "इडापिडा जाओ । बळीचे राज्य येवो" असा आशीर्वाद देतात. म. फुल्यांच्या मते बळीची परंपरा ही शेतकऱ्यांच्या राज्याची लोकशाही परंपरा होती. भारतात ती गाडली गेली. पण युरोपात ती कायम राहिली. सत्यधर्माचा प्रचार करणारा येशू ख्रिस्त हा बळीराजाच होता. ब्रूटस, फ्रेंच क्रांतीतील शेतकऱ्यांचा पुढारी लफायते, थॉमस पेन, अमेरिकी राज्यक्रांतीचा नेता वॉशिंग्टन हे बळीचेच

अनुयायी होते. त्यांनी आपल्या देशात लोकशाही राज्य आणले.[१३]

म. फुले यांची धेय्यदृष्टी शासन व शोषण यांपासून मुक्त असे 'बळीचे राज्य' स्थापन करण्याची होती. त्यास कधी कधी ते 'निर्मिकाचे राज्य' असेही म्हणतात. 'निर्मिकाचे राज्य' तेव्हाच स्थापन होईल जेव्हा सर्वांना न्यायाने व समानतेने वागवणारी, सर्वधर्मसहिष्णुता व सर्वधर्मसमावेशक, विश्वकुटुंबात्मक अशी कष्टकऱ्यांची आदर्श समाजरचना स्थापना करण्यात येईल. त्यात प्रत्येक जण भावा-बहिणीप्रमाणे (पती-पत्नीचे नाते वगळता) राहील. प्रत्येक जण वस्तूंचा श्रमाप्रमाणे उपभोग घेईल. प्रत्येक जण सत्यधर्माप्रमाणे वागेल. या राज्यात शिपाई, पोलीस, न्यायाधीश व तुरुंग यांना फारसे स्थान असणार नाही.

जुने 'बळीचे राज्य' ब्राह्मणांच्या कपट कारस्थानामुळे नष्ट झाले. महाराष्ट्रातील शूद्र शेतकरी अनेक प्रकारच्या शोषणांनी जर्जर झालेला आहे. त्यांची या शोषणातून सुटका होणे गरजेचे आहे. तरच 'बळीचे राज्य' स्थापन करता येईल. फुल्यांची जी धेय्यदृष्टी आहे ती आपणास प्रत्यक्षात आणता येईल.

म. फुल्यांच्या मते शेतकऱ्यांची परिस्थिती मोठी वाईट आहे. कारण त्यांचे धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक शोषण होत आहे. सावकारशाही, नोकरशाही व साम्राज्यशाही या तीन जळवा त्यांचे आर्थिक शोषण करीत आहेत. त्यांच्या वेगवेगळ्या पुस्तकांतून—विशेषत: 'गुलामगरी', 'शेतकऱ्याचा आसूड' या पुस्तकांतून—शोषणाचे हे विविध प्रकार त्यांनी सविस्तर वर्णन केले आहेत.

## शेतकऱ्यांचे धार्मिक शोषण :

'शेतकऱ्याचा आसूड' आणि 'ब्राह्मणाचे कसब' या दोन्ही पुस्तकांत जोतीरावांनी ब्राह्मण शेतकऱ्यांचे धार्मिक शोषण कसे करतात याचे मोठे मार्मिक विवेचन केले आहे. मुळात शेतकरी हा धार्मिक वृत्तीचा. त्याच्या धार्मिक वृत्तीत अंधश्रद्धा दडलेली. या अंधश्रद्धेचा व देवभोळेपणाचा उपयोग करून ब्राह्मणांनी त्यांच्यामागे वेगवेगळ्या व्रतांचे व विधींचे शुक्लकाष्ठ

लावून दिले आहे. या सर्व व्रतांचा आणि विधींचा मुख्य उद्देश म्हणजे गरीब शूद्रांकडून दक्षिणा लुबाडून घेणे हा आहे. रोख दक्षिणा, धान्य, सुपारी, बदाम, कपडे इत्यादी अनेक बाबी शूद्र शेतकऱ्यांकडून धर्माच्या नावाने ब्राह्मण लुबाडतात. ब्राह्मण खास विधी करून व सणांच्या मुहूर्तावर शेतकऱ्यास सातत्याने लुबाडतात.

ब्राह्मण शेतकऱ्याच्या घरात मूल जन्मास आले की, त्याच्या घरी जाऊन त्यास खोटेनाटे सांगून त्याच्याकडून पैसे उपटतात. त्याच्या मुलास ग्रहपीडा आहे असे सांगतात. मग शेतकरी म्हणतो, ''ग्रह धाक पीडा म्हणे कर्ज काढू । भांडीकुंडी मोडी । सुखासाठी ।।'' काही आजारामुळे मूल मरते पण कर्ज मात्र शेतकऱ्याच्या उरावर राहते. शेतकऱ्याच्या घरी लग्नाच्या वेळी ब्राह्मण जोशी येतो व त्यास लुबाडतो. त्यास खोटेनाटे विधी करावयास सांगतो. ते सांगतात, ''काड्या मुड्या जाळी । लज्जाहोम केला । नाही मनी धाला । लज्जाहीन ।।'' शूद्राच्या घरी ऋतुशांतीच्या वेळीही तो असेच निरर्थक विधी करावयास लावतो. तुपाने चळचळ माखलेले जेवण खाऊन तो तुंबळ दक्षिणा घेऊन जातो. वास्तुशांतीच्या वेळी ब्राह्मण असाच शेतकऱ्यास लुबाडतो. जीवाची बाजी लावून काम करणारे गवंडी, सुतार वगैरे लोक नंतर जेवतात. पण हा ब्राह्मण मात्र 'उद्योगाआधी' खातो. त्याला त्याची लाजही वाटत नाही.

या खास प्रसंगाव्यतिरिक्त हिंदुंचे अनेक सण वर्षभर असतात आणि या प्रत्येक सणाच्या दिवशी भटजी शेतकऱ्यास लुबाडतो. आपल्या एका पवाड्यात जोतीरावांनी ब्राह्मणांचे हे लुबाडणे मोठ्या प्रत्ययकारकरीत्या वर्णन केले आहे. ते लिहितात –

*पाडवा गुडी । ढाल फडफडी । रामजन्माचा पसार ।*
*काढी हनुमंत पाठीवर ।।*
*आषाढमासी । एकादशी ।। बाकी चार सोबभवार ।*
*पूजवितो बैल बेंदूर ।।*
*नागपंचमी । कृष्ण अष्टमी । ब्राह्मण भोजनाचा भार ।*
*चंगील तूप पोळीवर ।।*

*पिंड मांडितो । पाया पडवितो ।*
*भादवि भट्टी व्यापार । माजला तट्टू गुलजार ।।*
*विजया दशमीस । पुजवी घोड्यास ।*
*फराळ धनतेरसवर । लक्ष्मी-पूजन वहीवर ।।*
*तुळशी लग्नात । मकर संक्रांत ।*
*वाचितो वर्ष फल सार । मजुरी घेतो हातावर ।।*
*पैसा उडाला । शूद्र बुडाला । उरला होळी संवस्कार ।*
*मारवी बोंब आखेर ।।*

ग्रहणासारखे मोके येताच ब्राह्मण शूद्र शेतकऱ्यास दानाचा भडीमार करावयास लावतो.

शूद्राच्या मृत्यूनंतरही भट शेतकऱ्याच्या पाठीमागे असतोच. तो त्याच्या मुलास अनेक विधी करावयास लावतो. त्यामुळे शेतकरी हातघाईवर येतो आणि कर्ज काढतो. म. फुले लिहितात —

*भट्ट धनको । शूद्र ऋणको । कर्ज शेतावर काढिले ।*
*भोजन जातीला दिले ।। थोड्या दिवसात । व्याज*
*मुदलात । गहाणखत चोख नवे केले । मिराशी भट्ट वारस*
*झाले ।। निमकहरामी । मोठे गुलामी । चाकरी यजमाना*
*ठेविले । तगादे यमदास बसले ।।*

भटजी हा खरे तर शूद्र यजमानाचा मोलाने विधी करणारा नोकर, पण तो मालक झाला. फुले म्हणतात की, एवढे सर्व करून शेतकऱ्याची 'मस्ती' जिरली नाही तर तीर्थयात्रा व इतर यात्रा त्याच्यामागे होत्याच. धर्माचा वापर करून आपले पोट जाळण्याचा हा भटाचा प्रयत्न होता.

भिक्षुकाचे त्या वेळचे मासिक उत्पन्न सुमारे वीस रुपये होते. त्यांना धान्य व इतर गोष्टी मिळत होत्या. त्या काळातील शेतकऱ्यांचे आणि छोट्या नोकरदारांचे उत्पन्न पाहता हा पैसा कमी नव्हता. जोतीरावांच्या मते ब्राह्मण यावेळी दोन गुन्हे करीत होते. पहिला गुन्हा म्हणजे धर्माचा खोटा अर्थ लावून लोकांची दिशाभूल करून ते भोळ्या शेतकऱ्यास फसवून लुटीत होते. दुसरा

गुन्हा म्हणजे ते कोणत्याही प्रकारचे श्रम न करता, कष्ट न करता धर्माच्या नावावर पक्वान्नांचे जेवण खात होते. शेतकऱ्यांचे हे धार्मिक शोषण ब्राह्मण करतात. त्याला कारण ब्राह्मणांचे कपट आणि शूद्र शेतकऱ्यांचा भोळेपणा हे होते. त्यामुळे जोतीरावांनी ब्राह्मणी धर्मावर अत्यंत कठोर शब्दांत टीका केली. भटांची भरती करणारे सत्यनारायण पूजेसारखे प्रकार शेतकऱ्यांनी करू नयेत असे त्यांचे सांगणे होते.

## सांस्कृतिक शोषण :

धार्मिक शोषणापासूनच शेतकऱ्यांचे सांस्कृतिक शोषण होते. कारण त्यांचे धार्मिक शोषण त्यांच्या अज्ञानामुळे होते. म्हणून त्यांनी आत्मस्थिती ओळखावी, आपले अधिकार ओळखावे. कारण मानवी अधिकार सर्वांना निसर्गत:च मिळालेले आहेत. त्यांचा उपभोग घ्यावा. शूद्रांच्या गुलामगिरीचे मुख्य कारण म्हणजे त्यांचे अज्ञान. विद्याबंदीमुळे शूद्र अज्ञानी राहिले. आपल्या 'शेतकऱ्याचा आसूड' या ग्रंथांच्या प्रस्तावनेत फुले लिहितात, "विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले, एवढे अनर्थ एका अविद्येने केले." या 'अविद्येने ब्राह्मणांचे सांस्कृतिक वर्चस्व तयार झाले. खोटा धर्म केला. त्याबाबत फुले लिहितात –

*कल्पनेचे देव कोरिले उदंड ।*
*रचिले पाखांड हितासाठी ।।*
*किन्नर गंधर्व ग्रंथी नाचविले ।*
*अज्ञ फसविले कृत्रिमाने ।।*

वैदिक वा हिंदू संस्कृतीतील अनेक गोष्टींना ते पाखंड म्हणतात. ब्राह्मणी धर्माला ते बहुरूपी ठकाचे लुटून खाण्याचे कृत्रिम सोंग म्हणतात. स्वर्गाला ते 'बागुलबुवा' मानतात. मूर्तीपूजेबाबत ते म्हणतात की, 'मूर्तीपूजा हा एक कल्पित ब्रह्मघोळ आहे. शूद्रास ब्राह्मणी धर्मातील पाचपेच कळू नयेत म्हणून त्याला दगड-धातूच्या मूर्तीवर भाव ठेवावयास शिकविले जाते. ज्ञानोबापासून रामदासापर्यंतच्या मराठी कवींना ते "पायलीने पंधरा व आधेलीचे सोळा"

कवी निर्माण होऊन केवळ वाया गेले असे म्हणतात. कारण त्यांनी धूर्तपणे भटांच्या धर्माची पाठराखण केली.

शेतकऱ्यांची सांस्कृतिक गुलामगिरीतून सुटका करावयाची असेल तर, त्यांना आधुनिक शि॰ाण दिले पाहिजे आणि बळीस्थानचा खरा इतिहास समजावून सांगितला पाहिजे असे म. फुले यांचे मत होते. शेतकऱ्यांनी शहाणे व्हावे, शिकावे आणि सत्यधर्माचे तत्त्वज्ञान आचरणात आणावे असे जोतीरावांचे सांगणे होते.

### सावकारांनी केलेले शोषण :

जोतीरावांच्या मते शेतकऱ्यांचे शोषण करण्यास सावकार आघाडीवर आहेत. कारण इंग्रजांच्या राजवटीत सावकारांच्या पाठीमागे त्याची न्यायालये आणि राजसत्ता उभी राहिली. हे सावकार मुख्यत: ब्राह्मण, मारवाडी आणि गुजर या जातीतील होते. इंग्रजांच्या राजवटीत शेतसारा देण्यासाठी, इतर खर्च भागविण्यासाठी शेतकऱ्यांना कर्ज काढावेच लागे. त्यामुळे सर्व शेतकरीवर्ग अट्टल कर्जबाजारी झाला होता. इंग्रजी राजवटीत नव्या कायदेकानूनमुळे दलाल, कमिशन एजंट आणि व्यापारी तयार झाले. त्यांची दुकाने होती. ते सावकारी करीत होते. औद्योगिक मालाची विक्री करण्यासाठी आणि कच्च्या मालाचा पुरवठा करण्यासाठी नव्या बाजारपेठा तयार झाल्या. या खरेदी-विक्रीच्या व्यवहारात दलाली करणारे मध्यस्थ तयार झाले. ते सावकारीही करीत होते. शेतसाऱ्याचा भरणा, बी-बियाण्यासाठी लागणारे भांडवल, लग्नादी धार्मिक विधीतील खर्च, बैल-बारदाना यांची खरेदी यांसाठी शेतकऱ्यास नड पडली की, ते गुजर-मारवाडी-ब्राह्मण सावकारांकडून भरमसाठ व्याजाने कर्ज घेत असत. शूद्र शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा व देवभोळेपणाचा फायदा घेऊन हे सावकार शेत जमिनीवरचा माल व्याजापोटी हडप करीत होते. पुढे त्यांच्या अडाणीपणाचा फायदा घेऊन दामदुपटीने व्याज गहाणवट केलेल्या जमिनीवर ते आपला कब्जा बसवीत. त्याच जमिनीवर मूळ मालकास कूळ म्हणून राबवीत. अशा प्रकारे सावकारशाहीतून गैरहजर जमीनदार तयार होत होते. जोतीरावांच्या लिखाणातून शेतकऱ्यांच्या

कर्जबाजारीपणाचा व त्यांच्या सावकारांकडून होणाऱ्या शोषणाचा सातत्याने उल्लेख होतो. या शोषणाच्या प्रक्रियेचे जोतीराव खालीलप्रमाणे वर्णन करतात. ते लिहितात –

> हिशेबी घोळ, सर्व गोंधळ, वाढवी कर्ज डोईवर । आतून होई सावकार । पैसा देई गहाणावर ।। वेळ पाहून संधी साधून । मागणी नेट त्याजवर । तगादा धाडी पाठीवर ।।
> दाम दुप्पट, सर्व एकवट । नोंदती गहाणखतावर दुमाला पुस्त रजिष्टर ।।

हा सावकार आपले पोट व्याजावर जाळतो. नंतर –

*हातावर देई । लेहूनी घेई ।*
*वायदा आट स्टँपांवर*
*ठोकली आर्जी अखेर ।।*
*धन्यावर जीव । केली मोठी कीव ।*
*बक्षीस बिनभाडे घर ।।*

शेतकऱ्यांना लुटण्यासाठी सावकार वेगवेगळे छक्केपंजे लढवितात. हे सावकार नापतीच्या अक्षरशून्य शेतकऱ्यांस सांगतात, "सरकारी कायद्याप्रमाणे तुम्हाला गहाणावर पैसे देता येणार नाहीत. यास्तव तुम्ही जर आपली शेते आम्हास खरेदी करून द्याल, तर आम्ही तुम्हास कर्ज देऊ व तुम्ही आमच्या रुपयांची फेड केल्यावर आम्ही तुमची शेते परत खरेदी करून तुमच्या ताब्यात देऊ." असे म्हणून हे शपथा करून बोल्या करतात. पण त्यांच्याकडून शूद्रास त्यांच्या जमिनी परत क्वचितच मिळतात. शेतकऱ्यास लिहिता वाचता येत नसल्यामुळे त्यांच्यावरील कर्जाच्या रकमा ते मनानेच वाढवतात. या सावकारांना ब्राह्मण नोकर मदत करतात. लाच खातात. शेतकऱ्यास बुडवतात.

'शेतकऱ्याचा आसूड'च्या चौथ्या प्रकरणात जोतीरावांनी त्यावेळच्या कर्जबाजारी आठ बैलांचा मालक असणाऱ्या शेतकऱ्याची दीनवाणी परिस्थिती वर्णिली आहे. शेतसारा देता देता कर्ज काढून हा शेतकरी

स्वत:च्या शेताची निगाही ठेवू शकत नाही.

## नोकरशाही पिळवणूक :

सावकारांची पिळवणूक शेतकऱ्याचे जीवन हराम करून टाकते. त्याचप्रमाणे सावकारांशी हातमिळवणी करून ब्राह्मण नोकरशाही सर्व अंगाने शेतकऱ्यांची पिळवणूक करते. म्हणून म. फुले म्हणतात –

*मोठमोठे दुकानदार । सारे भटच अंमलदार ।*
*गरीब शूद्रांवर कहर । हे पहा करती जोजार ।*
*असे आंधळे सरकार ।।*

त्या काळात भारतात दोन प्रकारची नोकरशाही होती. एक युरोपीय नोकरशाही आणि दुसरी एतद्देशीय नोकरशाही. त्यांच्या मते इंग्रज अधिकारी लठ्ठ पगार घेऊन ऐषआरामात राहतात. आपल्या कर्तव्याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे भट कामगारांचे फावते. ते शूद्रांच्या अज्ञानाचा आणि अडाणीपणाचा फायदा घेऊन त्यांना लुबाडतात. लाच खातात. आपल्या जातभाईस मदत करतात.

इंग्रजी राजवटीत खालच्या पातळीवरच्या व मध्यम दर्जाच्या सर्व नोकऱ्या ब्राह्मणांना मिळालेल्या होत्या. न्यायाधीश, मामलेदार, शिरस्तेदार, बेलीफ, इंजिनियर, शिक्षक, शिक्षणाधिकारी, फौजदार या जागा ब्राह्मणांनी बळकावलेल्या होत्या. नोकरीतील ब्राह्मणांच्या मक्तेदारीमुळे ब्राह्मणांचा शूद्र शेतकऱ्यांवरील अन्याय वाढला. फुले ही मक्तेदारी खालीलप्रमाणे वर्णन करतात –

*खेडेगावी कुलकर्णी । आहे लेखणीचा धनी ।।*
*महालामध्ये महालकरी । जसा अष्ट अधिकारी ।।*
*यमवत मामलेदार । शूद्राशिक्षा अनिवार ।।*
*धूर्त चिटणिसापुढे । काय कलेक्टर बापुडे ।।*
*रेव्हेन्युची दफ्तरदारी । किती ब्राह्मण अधिकारी ।।*
*चहूकडे भटभाई । कुणब्याची दादच नाही ।।*

फुल्यांच्या मते खेडेगावातील कुलकर्णी शेतकऱ्यांवर अन्याय करतो. त्यांच्या मालकीपत्रात लाच खाऊन फेरफार करतो. अज्ञानी शेतकऱ्यास थोडी रक्कम कर्जाऊ देऊन त्याची जमीन लाटण्याचा उद्योग हा सतत करीत असतो. स्वत:च्या साक्षरतेचा तो असा दुरुपयोग करतो. म्हणून संतापाने म. फुले त्यास 'कलम कसाई' व 'ग्रामराक्षस' म्हणून संबोधितात. तालुक्याच्या पातळीवर तर त्यांचेच राज्य आहे. ब्राह्मण अधिकारी एकत्र येऊन शेतकऱ्यांविरुद्ध खोटे रिपोर्ट, खोटे अर्ज, खोट्या सह्या, खोट्या साक्षी तयार करतात. सावकारास मदत करण्यासाठी हे अधिकारी ब्राह्मण वकिलाच्या मदतीने खटल्याचे पूर्ण रूपच बदलून टाकतात. त्यामुळे शेतकऱ्याचे नुकसान होते.

भट कामगार शेतकऱ्याचे खालील प्रकारे नुकसान करतात असे जोतीरावांचे म्हणणे होते. ते लिहितात –

(१) भट कामगाराच्या हातावर पैसा ठेवल्याशिवाय ते गरिबाच्या कामाला हात लावीत नाहीत.

(२) सडकेच्या कामावर बिगारी म्हणून लावल्यास भट अधिकाऱ्यांची मूठ गार केली नाही, तर ते वरच्या अधिकाऱ्यांना चहाड्या सांगतात.

(३) भट मामलेदार आपल्या जातभाईंची कामे करून घेण्यासाठी पुण्यासारख्या ठिकाणीसुद्धा 'झोटिंग बादशाही' करतात.

(४) भट कामगार कागदपत्रे अधिकाऱ्यास वाचून दाखविताना लबाडी करतात आणि आपल्या जातवाल्यास मदत करतात.

(५) गोऱ्या अधिकाऱ्यांना मराठी भाषा चांगल्या प्रकारे समजत नाही. मराठीतून इंग्रजीत तरजुमा करताना भट कामगार लबाडी करतात.

सरकारच्या इंजिनियरिंग खात्यात भट कामगार नुसती पेंढार गर्दी करतात. फाजील हजेऱ्या लावून, असलेल्याचे खाडे लावून हे लोक हरामीचा पैसा खातात. बारा दिवस काम दाखवून अठरा दिवसांची मजुरी घेतात. भाजीपाला कुटणे, शेतकऱ्यांकडून सरपण फोडून घेणे इत्यादी गोष्टी ते हरहम्मेश करतात. म्हणून फुले लिहितात –

*नुकसानीचा पैसा माती भरीस घालिती ।*
*दाखला फिगरेठी लिहिती ।*
*लूट धुमाळी पैसा आठवण रमण्याची होती ।*
*रपोटी मेल लिहिती ।।*
*खजिन्यातील पैसा सरता कर योजिती ।*
*हाडे कुणाची पिळती ।।*

सरकारी नोकरांची जुलमी वागणूक सरकारी कायदेकानूनच्या आधारे चालते. म. फुल्यांच्या मते सरकारचे धोरणसुद्धा मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या पिळवणुकीला जबाबदार आहे. पण. साम्राज्यशाही पिळवणुकीबद्दलचा सरकारचा दृष्टिकोन दुहेरी आहे.

**साम्राज्यशाहीची पिळवणूक :**

जोतीरावांचे असे मत होते की, ''ब्राह्मणांच्या गुलामगिरीतून शेतकऱ्यांना सोडवणारे इंग्रज सरकार तसे शेतकऱ्यांचे तारणहार आहे. भारतातील राणीची सत्ता जागृत नाही म्हणून अन्याय होतो आहे.'' ब्रिटीश सरकार आंधळे आहे असे ते म्हणतात. पण त्या सरकारकडूनच खरी आशा आहे. कारण इंग्रजांनी स्वातंत्र्याचा जगभर पुरस्कार केलेला आहे. ते लिहितात, ''राणीबाई लस देई । दु:ख हे रडूनी गाईले । द्विजांनी शूद्रा गांजले । कीर्ती ऐकून आलो धावून । जगामधी दास सोडविले । धडे त्वा कैकाला दिधले ।।'' येथे ब्रिटिशांनी शूद्र शेतकऱ्यांना मदत करावी अशी फुल्यांनी विनंती केली आहे.

ब्रिटीश सरकारचे गोरे नोकर लठ्ठ पगार घेतात. पण ते ऐषआरामी आहेत. कलेक्टर, जज हे व त्यांच्या हाताखालच्या खोटेनाटे लिहून देणाऱ्या ब्राह्मण अधिकाऱ्यांच्या हातातील बाहुले आहेत. त्यांची वागणूक फुले खालील प्रमाणे वर्णितात –

*ठेपले गोरे येऊन । कचेरी तंबू घेऊन ।।*
*थकले शिकार खेळून । कागदी सह्या करून ।।*

*भटावरं बाकी सोपून । विसावा ग्लास घेऊन ।।*
*शोभती खासे कोचास । वाचती न्युज पेपरास ।।*

पण फुल्यांच्या ही गोष्ट लक्षात आली होती की, सरकारी धोरणे शेतकऱ्यांच्या विरोधी आहेत. म्हणून 'शेतकऱ्याचा आसूड' लिहीत असताना त्यांची भाषा तिखट बनलेली आहे.

जोतीरावांच्या मते शेतकऱ्यांवरील सारा दर तीस वर्षांनी शेतीमध्ये कोणतीही सुधारणा न करता वाढविण्याचे सरकारचे धोरण अन्यायकारक आहे. कारण केवळ शेतसारा देण्यासाठी त्यास कर्ज काढावे लागते. सरकारने आपल्या अधिकाऱ्यांना मोठमोठे पगार व पेन्शनी देण्यासाठी शेतसाऱ्याचे दर वाढविले. गरीब शेतकऱ्यांच्या गाडग्या-मडक्यातून हा सारा वसूल केला. रात्रंदिवस शेतीत खपणाऱ्या शेतकऱ्यावर हा सारा कमी होता की काय म्हणून लोकल फंड नावाचा नवा कर त्यांच्यावर लादला. त्याशिवाय आपले धान्य व माळवे विकण्यास शेतकरी जात असताना दर सहा मैलावर जकातीचे नाके बसवून त्यांनी जकात वसूल करावयास सुरुवात केली. त्याचप्रमाणे अकारण सरकारने मिठावरही कर लादला आहे. बाजारातील दगेबाज दलाल, म्युन्सिपालिटीचे लुटारू जकात अधिकारी यांच्यापासून त्या शेतकऱ्यांची काही सुटका होत नाही.

सरकारने जंगल खाते निर्माण करून जंगलाच्या सर्व जमिनी आपल्या घशात घातल्या. विपत्तीच्या काळात शेतकरी आणि त्याची जनावरे जंगलांच्या संपत्तीची जपणूक करून कसाबसा जंगलाच्या आधारावर दिवस काढीत असे. पण आता तेही शक्य झालेले नाही. गायरान जमिनी सरकारच्या घशात गेल्यामुळे शेतकऱ्याचे नुकसान झाले. त्याचे उत्पन्न घटले. फुल्यांचा ब्रिटिशांच्या जंगल खात्यावर फार रोष होता.

इंग्रजांनी युरोपातील सावकारांकडून कालवे बांधण्यासाठी कर्ज काढले. त्यांना महासूर व्याज दिले. ते सारे कर्ज भारताच्या बोडक्यावर लादले. या कालव्यातील जे पाणी आहे, त्याचा दर फार जास्त आहे. चढा दर देऊनही शेतकऱ्यास त्याच्या शेतासाठी योग्यवेळी पाणी मिळत नाही. भारतीयांच्या

डोक्यावर परक्या सावकारांचे कर्ज आहे आणि या कर्जापोटी दरवर्षी कोटी रुपये व्याज म्हणून शेतकऱ्यास त्या सावकारांना द्यावे लागतात. आता परकीय सावकारांच्या इंग्लंडातील कर्जाची रक्कम जवळ जवळ १०० कोटी रुपये झाली आहे. जोतीराव लिहितात, "सरकारचे मनात जर आमच्या कंगाल शेतकऱ्यांबद्दल कळवळा आहे, तर ते आपल्या विलायती सावकाराचे एक अब्ज रुपये व्याज का बरे देत नाहीत? आणि तसे केल्यावर शेतकऱ्यांचे पाय धारी कसे लागत नाहीत हे पाहू बरे? पण आमच्या सरकारने मध्येच एखादी नवीन मोहीम परदेशात काढून तिकडे ही रक्कम खर्ची घालू नये म्हणजे मिळविले." याचा अर्थ साम्राज्यशाही शेतकऱ्यांचे कसे शोषण करीत आहे, भारतातील पैसे कसे परदेशात जात आहेत याची स्पष्ट जाणीव जोतीरावांना होती.

पूर्वीचे राज्यकर्ते इंग्रजासारखे विद्वान नव्हते. पण ते अक्षरशून्य असले तरी रयतेचा पैसा लोकोपयोगी कार्यात वापरीत असत. रस्त्याच्या बाजूस झाडे लावणे, गावकूस, धर्मशाळा, पूल, तळी, विहिरी, किल्ले, गढ्या बांधणे वगैरे गोष्टी ते सरकारी पैशातून करीत असत. परंतु फुल्यांच्या मते "म्युन्सिपालिटीच्या द्वारे व अन्य मार्गाने रयतेचे द्रव्य हरण करून सरकार त्या द्रव्यापासून सदरची कामे पूर्ण करू लागल्यामुळे आतून रयतेस दिवसेंदिवस प्रामाणिकपणे चरितार्थ चालविण्याचे सामर्थ्य कमी होत आहे." सध्याच्या सुबत्तेच्या काळात सुमारे चार कोटी रयतेस दोन वेळा पोटभर अन्न मिळत नाही असे फुले यांचे मत होते.

इंग्रजी राजवटीचे समाजावर अनेक वाईट परिणाम झाले. ते भारतात आल्यापासून त्यांच्या कसबी कारागिरांनी यंत्राद्वारे निर्माण केलेला माल भारतात विकावयास सुरुवात केली. त्यामुळे येथील ढोर, मांग, विणकर, लोहार यांचे धंदे बसले. ते पुरते भिकारी झाले. येथील मालाला मंदी आली. त्यामुळे येथील कोष्टी, साळी, मोमीन, जुलाहा वगैरे लोक बेकार झाले. त्यांचा इतर देशांशी व्यापार नसल्यामुळे फुल्यांच्या मते ते पुरते नागवले. शिवाय येथील तांदूळ, कापूस, आळशी, कातडी, लोकर वगैरे मालाचा येथे उठाव न झाल्यामुळे तो माल इंग्लंडातील व्यापारी वाटेल त्या दराने

स्वस्त खरेदी करून, विलायतेतील कसबी लोकांस विकून गबर झाले आहेत. हे झाले भारतातील कच्च्या मालाचे शोषण. पक्का माल भारतात आयात कसा होतो याबाबत म. फुले लिहितात, "हे विलायती गोरे इंजिनियर गोऱ्या डॉक्टराच्या मिलाफाने आपल्या देशातील कारागीर लोकांच्या सामानसुमानांचा येथे खप व्हावा या इराद्याने आपल्या पोटावर इंगल ओढण्याकरिता अशा नाना प्रकारच्या युक्त्या करून बेसमज जनतेचे द्रव्य बेलगाम उडवतात. त्यातच इंग्रजांनी येथील कसबी लोकांनी तयार केलेल्या विलायती जिनसेवर अजिबात जकात काढून टाकली. त्यामुळे येथील कामगारांचे नुकसान झाले."

जोतीरावांच्या मते शेतकऱ्यांच्या निढळाच्या घामाचा पैसा सरकार गोऱ्या नोकरांच्या व काळ्या नोकरांच्या लठ्ठ पगारावर व पेन्शनीवर खर्च करते. शेतकऱ्याने आपल्या सर्व कुटुंबासह शेतात दिवसरात्र खपावे त्यावेळी त्यास सारा, लोकल फंड वारून महिन्याला माणसी तीन तीन रुपये पडत नाहीत आणि युरोपियन नोकरास व काळ्या कामगारास दरमहा दहा पंधरा रुपये किरकोळ खर्जास व दारू-पाण्यास पुरत नाहीत. इंग्रजांनी शेतकऱ्यास नागवा व उघडाबंब केला आहे. त्यास खाण्यास पुरेसे अन्न नाही. ल्यावयास कपडे नाहीत. शेतकरी हा सर्व देशाच्या सुखाचा पाया असूनही त्याची परिस्थिती इतकी वाईट आहे.

शेतकऱ्यांपासून मिळणारा पैसा खर्च करून शेतकऱ्यांच्या मुलाला शिक्षण देण्याची जबाबदारी इंग्रज सरकारची आहे. पण इंग्रजांनी आपली ही जबाबदारी पार न पाडता, तो पैसा ब्राह्मण मुलांच्या शिक्षणासाठी खर्च केला. त्यामुळे फुले लिहितात –

*शूद्र दीन बंधू शेतीत खपतो । कुटुंबा पोशितो । बैलासह ।।*
*साऱ्यासह वारी लोकल फंडास । घाली भारतीय । काही धान्य ।।*
*गोळा सर्व फंड इंग्रज करिती । शाळा ते घालिती । नावासाठी ।।*

जोतीराव पुढे लिहितात –

*साऱ्यासह फंड शूद्र किती देती । धूर्त आर्य खाती ।*

*शाळा खाती ।।*
*शूद्रादिक त्यांनी किती शिकविले । कामगार केले । दावा आम्हा ।।*
*शूद्राजी थकले फंड देता देता । भटास पोशिता । जोती म्हणे ।।*

महात्मा जोतीराव फुले यांनी साम्राज्यशाही शोषण कशा प्रकारे होते याचे चांगले विवेचन केले आहे. भारतातील शेतकऱ्यांवर शेतसारा व इतर पट्ट्या लादून त्यांची लूट करणे, देशभर दुष्काळ असताना अन्न-धान्य व कच्चा माल यांची निर्यात करणे, पक्का माल आयात करून येथील कारागिरास कंगाल करणे, जंगल खाते सुरू करून शेतकऱ्यांची नाकेबंदी करणे, विलायती सावकारांकडून कर्ज देऊन त्यांना भरमसाठ व्याज देणे, युरोपीय कामगारांना भरमसाठ पगार व पेन्शन देणे आणि गोऱ्या सोजिरास आरामात ठेवणे. सोजिर आरामाने लालजागर पडला आहे तर शेतकरी भुकेकंगाल बनला आहे. सरकार लष्करावर मोठ्या प्रमाणात खर्च करीत आहे, हेही फुल्यांनी लोकांना सांगितले.

## शेतकऱ्यांच्या दुरवस्थेची अन्य कारणे :

शेतकऱ्यांचे आयुष्य दीनवाणे करण्यामागे त्यांचे धार्मिक, सांस्कृतिक सावकारशाही, नोकरशाही आणि सम्राज्यशाही शोषण प्रामुख्याने जबाबदार होते. पण म. फुले यांच्या मते या कारणांव्यतिरिक्त त्यांच्या दुरवस्थेची इतरही काही कारणे होती. 'शेतकऱ्याचा आसूड' या ग्रंथामध्ये जोतीरावांनी त्या कारणांचाही विचार केला होता.

म. फुल्यांच्या मते शेतकऱ्यांच्या दुरवस्थेचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली हे आहे. या लोकसंख्या वाढीचे पहिले महत्त्वाचे कारण म्हणजे गेल्या ५०-६० वर्षांत मोठी युद्धे न झाल्यामुळे चघळ खानेसुमारी मोठ्या प्रमाणात वाढली. त्या लोकसंख्येला इतर कामे नसल्यामुळे त्यांचा बोजा शेतकऱ्यावर पडला. येथील एकंदरीत सर्व लोक रात्री निरर्थक उत्पत्ती वाढविण्याचे छंदात लंपट झाल्यामुळे येथील चघळ खानेसुमारी फार वाढली. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांत भाऊहिस्से एवढे वाढले की कित्येकास पाभारीच्या आठ आठ,

दहा दहा पेऱ्यावर गुजारा करावा लागतो. अशा लहान शेतकऱ्यांजवळ एक दोन बैल बाळगण्याची ऐपत नसते. ते आपली शेती शेजाऱ्यापाजाऱ्यास अर्धेतीने व खंडाने देऊन आपली मुलेबाळे घेऊन कोठे तरी परगावी मोलमजुरी करून पोट भरण्यास जातात. त्यांची अवस्था मोठी वाईट आहे.

शेतकऱ्यांच्या दुरवस्थेचे आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे १८१८ पासून १८५६-५७ पर्यंत इंग्रजांनी अनेक संस्थाने जिंकून घेतली. खालसा केली. या जिंकलेल्या व खालसा केलेल्या राजेरजवाडे व नवाब यांच्याकडे लाखोच्या संख्येने लोक नोकरीत होते. त्यांच्या लष्करात, खाजगी दफ्तरखान्यात अनेक शूद्र शेतकऱ्यांस काम मिळत असे. त्यामुळे शेतकऱ्यास शेतसारा देणे कठीण जात नसे. परंतु जोतीरावांच्या मते ''हल्ली सदरचे बादशहा राजेरजवाडे लयास गेल्यामुळे सुमारे २५ लक्षाचे वर शूद्रादी अतिशूद्र शेतकरी वगैरे लोक बेकार झाल्यामुळे त्या सर्वांचा बोजा शेतकी करणारावर पडला आहे.'' त्या काळात हा शेतीवर मोठाच भार पडलेला होता.

''शेतकऱ्यांनी मोठ्या शेतकऱ्याच्या शेतावर मोलमजुरी करून उदरनिर्वाह करावा तर मोलाने मजूर लावण्याइतकी आर्थिक ऐपत असलेला शेतकरी आता राहिलेला नाही. शेतीचे सत्त्व कमी झाले आहे. शेतांना आता पूर्वीसारखा विसावा मिळत नाही. मलमूत्रांचे खत मिळत नाही. जिराईने शेते पिके देऊन थकली. बागायती जमिनीतील फूल कमी झाल्यामुळे हल्ली बागायतात पूर्वीसारखे पीक होत नाही. गायरानांच्या कमतरतीमुळे जनावरांना पोटभर चारा मिळत नाही. त्यामुळे जनावरं थकली आहेत. मजबूत बैलांचे बेणे कमी झाले आहे. त्यामुळे बागायत आणि जिरायत जमिनीची पहिल्यासारखी उस्तवारी आता होत नाही. शेतकऱ्यांची हिंमत खचत आहे, ते रोगराईस बळी पडत आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून शेतीची मशागत होत नाही. खतांचा नासाडा होत आहे.'' जोतीराव लिहितात, ''मुंबईसारख्या बकाली म्युनिसिपालिटीतील गोऱ्या इंजिनियर व डॉक्टर कामगारांच्या गैरमाहितीमुळे अथवा त्यांच्या आडदांडपणाच्या शैलीमुळे लक्षावधी खंडी खाताचे सत्त्व वाया जात आहे.'' या सर्व गोष्टीमुळे

शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. त्यातच शेतकऱ्यांच्या जवळच्या बंदुका आणि बरच्या हिसकावून घेतल्यामुळे त्यांच्या पिकांचा रात्री डुकरे नास करतात. "बाकी उरलेल्या पिकांवर ब्राह्मण, मारवाडी, लिंगायत सावकार, गुजराती आडते आणि इतर जातीतील दलाल दीडीवाले नजर ठेवून त्यास ओरबाडून खातात." अशा प्रकारे जोतीरावांच्या मते शेतकरी मोठ्या दु:स्थितीत आहे.

## शेतकरी समुदाय आणि म. फुले :

म. जोतीराव फुले यांनी इ. स. १८८३ साली आपला 'शेतकऱ्याचा आसूड' हा ग्रंथ लिहिला. या पुस्तकात त्यांनी सर्व शेतकरी एकच गणला आहे. कारण त्यांच्या मते लहानमोठ्या सर्वच शेतकऱ्यांची अज्ञानामुळे नोकरशाहीच्या व भटशाहीच्या जुलमामुळे आणि साम्राज्यशाहीच्या शोषणामुळे दैना उडालेली आहे. म. फुले यांच्या मते सांप्रत शेतकरी म्हटले म्हणजे त्यात तीन भेद आहेत. कुणबी, माळी आणि धनगर. या भेदाचे कारण इतर काही नसून व्यावसायिक आहे. मूळचे जे लोक शेती करून निर्वाह करू लागले ते कुळवाडी किंवा कुणबी. जे आपले शेतीचे काम सांभाळून बागायती करू लागले ते माळी आणि जे दोन्हीही करून मेंढरे-बकरे वगैरे कळप पाळू लागले ते धनगर. यातील पुढे काहीजण राजेरजवाडे, इनामदार, जहागिरदार व वतनदार झाले. त्यांचे वंशज आता शूद्र शेतकऱ्यांच्या परिस्थितीची काळजी न करता ऐषआरामात, अज्ञानात जीवन जगत आहेत. म. फुले यांच्या मते हे राजेरजवाडे 'दिवसा गोप्रदाने आणि रात्री प्रजोत्पादने' करण्यात आनंद मानतात. त्यामुळे त्यांच्याकडून सध्या तरी फारशी अपेक्षा नाही. पण माळ्या-कुणब्यात स्वत:स खास मराठा म्हणून शेखी मिरवणारा, ज्याचे शिंदे-गायकवाडांसारख्या सरकारांशी एकेकाळी नातेसंबंध होते, ज्याच्याजवळ आठ बैलांचे काम चालण्याइतकी शेती आहे, असा शेतकरीही आज अतिशय वाईट परिस्थितीत आहे.

या शेतकऱ्यांच्या घरची परिस्थिती म. फुल्यांनी 'शेतकऱ्याचा आसूड' या ग्रंथांच्या चौथ्या प्रकरणात विस्ताराने वर्णन केलेली आहे. ब्राह्मण

भटभिक्षुकांनी, सावकारांनी, सरकारी नोकरांनी हा अक्षरशून्य शेतकरी पूर्णत: नागवला आहे. त्याच्या घरची परिस्थिती मोठी वाईट आहे. घरात सगळीकडे घाण पसरलेली आहे. तेथे व्यवस्था अशी नाहीच. पण कोर्टात पेशा करून, पैसे खर्च करून तो शेतकरी अट्टल कर्जबाजारी झाला आहे. सगळीकडून नागवला गेलेला शेतकरी मनाशीच मोठ्या दु:खाने म्हणतो, "बैल विकून जर सारा द्यावा तर शेतकी कोणाच्या जीवावर ओढावी? व्यापारधंदा करावा तर मला लिहिता वाचता मुळीच येत नाही. आपला देश त्याग करून परदेशात जाते तर पोट भरण्यापुरता हुन्नर ठाऊक नाही. कण्हेरीच्या मुळ्या मी वाटून खाल्यास कर्तीधर्ती मुले आपली कशी तरी पोटे भरतील, पण मला जन्म देणाऱ्या वृद्ध बयेस व बायकोसह माझ्या चिटुकल्या लेकरास अशा वेळी कोण सांभाळील?" थोडक्यात, लहानमोठे सर्वच शेतकरी सध्या दैन्यावस्था भोगत आहेत.

आपल्या पुस्तकाच्या शेवटी म. फुले लिहितात की, "या प्रकरणात शूद्रांपैकी बडे बडे राजेरजवाडे व लहानसहान अज्ञानी संस्थानिकांच्या आणि अतिशूद्रांच्या लाजीरवाण्या स्थितीविषयी बिलकूल वर्णन केले नाही. याचे पहिले कारण आपल्या पोकळ वैभवामुळे आणि दुसरे आपल्या दुर्दैवामुळे शूद्र शेतकऱ्यांपासून दुरावलेले आहेत. या पुस्तकात फक्त मध्यम व कनिष्ठ प्रतीच्या शेतकऱ्याचे हालच वर्णन केले आहेत." पण शेतकऱ्यांच्या मुक्तीसाठी शूद्र शेतकरी आणि अतिशूद्र यांनी एकत्र येणे आवश्यक आहे, असे ते सांगतात.

## शेती आणि पाणी :

न्यायमूर्ती रानडे आणि सार्वजनिक सभेवर फुल्यांचा राग होता. कारण परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी न करता "आता शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारते आहे. शेतकऱ्याच्या कर्जबाजारीपणाला कारण तो लग्नात जास्त खर्च करतो हे आहे," इत्यादी विचार सभा मांडीत असे. जोतीरावांच्या मते सार्वजनिक सार्वजनिक सभा नावालाच 'सार्वजनिक' आहे. त्यात शेतकरी, बलुतेदार, मांग, महार यांचा समावेश नाही. पाचपन्नास ब्राह्मणांनी सर्वांचे नाव घेऊन

ब्राह्मणांना सरकारी जागा मिळवून देण्यासाठी उभे केलेले ते एक सोंग आहे, असे त्याबाबत जोतीरावांचे मत होते. जोतीरावांनी 'इशारा' ही पुस्तिका रानड्यांच्या मताचा प्रतिवाद करण्यासाठी लिहिली. रानड्यांना शेतकऱ्यांचे व खालच्या जातींचे दु:ख माहीत नाही म्हणूनच ते 'जातिरचना प्रगतीस बाधक नाही' असे बोलू शकतात असे जोतीरावांचे मत होते. म्हणूनत त्या पुस्तिकेच्या सुरुवातीसच त्यांनी कबीराचे "जिस तन लागे वहि तन जाने । बीजा क्या जाने गव्हारा रे ।। हे वचन उद्धृत केले आहे. या पुस्तिकेत शेती व पाणी या विषयावर जोतीरावांनी त्यांचे विचार मांडले आहेत.

म. फुले यांच्या मते शेतीच्या विकासासाठी पाणी असणे मोठे गरजेचे आहे म्हणून शेतकऱ्यास जर पाणी आहे, तर या सर्व गोष्टी आहेत. शेतकऱ्यास पाणी मिळाले तर तो खराब जमिनीवरही चांगले पीक काढू शकतो. खडकाळ जमिनीतही उत्पन्न निघू शकते. पाणी गेले की त्याचे ऐश्वर्य जाते. सृष्टीक्रमाप्रमाणे पर्जन्य कोणत्याही एका भागावर पडला तर दुसरे भागावर पडत नाही. त्यामुळे तो एका भागावर पडतो तर दुसऱ्या भागावर पडत नाही. त्यामुळे शेतकरी लोकांस अन्नधान्याची तूट पडते. त्यामुळे सतत बारा महिने कॅनालने पाणी मिळाले तर हवेच आहे.

ज्या भागात पाटबंधारे खात्याचे कालवे आहेत त्या भागातील पाणी सोडणारे कामगार हे बेपर्वा आणि भ्रष्टाचारी आहेत. फुले सांगतात की, सरकारचा पाणीपट्टीचा दर जास्त, पण इंग्रज कामगार त्याकडे लक्ष देत नाहीत. भट कामगार शेतकऱ्यास वेळेवर पाणी देत नाहीत. पाणी देण्याऐवजी ते शेतकऱ्याशी अरेरावीची व उद्धट भाषा करतात. पुन्हा सरकार सांगते की, वक्तशीर पाणी न मिळाल्यामुळे जर शेतकऱ्यांचे काही नुकसान झाले तर त्यास सरकार जबाबदार नाही. फुले लिहितात की, 'हजारो रुपये पगार घेणाऱ्या इंजिनियरांना धरणात किती गॅलन पाणी आहे, याचा अंदाज असणे जरुरीचे आहे. त्याप्रमाणेच त्यांनी पुढे पाणी अखेरपावेतो जेवढ्या जमिनीत पुरेल तितक्याच जमिनीच्या मालकास पाणी घेण्याची परवानगी द्यावी. त्यांच्या बेहिशोबीपणामुळे शेतकऱ्याचे नुकसान होते म्हणून जोतीरावांनी अशी मागणी केली की, सरकारने शेतकऱ्यास वेळेवर पाणी

दिले पाहिजे. त्याचप्रमाणे सरकारने प्रत्येक शेतकऱ्यास शेताच्या पाण्याच्या मानाने प्रत्येकास एक एक तोटी करून द्यावी; जीजपासून शेतकऱ्यास वाजवीपेक्षा जास्त पाणी घेता येऊ नये. त्यामुळे शेतकऱ्याचाही फायदा होईल व सरकारच्या पैशाची बचत होईल. आज महाराष्ट्रात पाणी वाटपाची जी चर्चा सुरू आहे तिला सुरुवात जोतीरावांनीच करून दिली आहे.

पाणी वाटपाची उपाययोजना, शेतकऱ्यांच्या सर्वांगीण मुक्तीसाठी सर्वांगीण सुधारणेचा कार्यक्रम, शेतीसुधारणेचा कार्यक्रम इत्यादी कार्यक्रम जोतीराव फुले यांनी सुचविले. शेतकऱ्याची पिळवणूक धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक, सामाजिक आणि राजकीय अंगाने होत आहे. त्या पिळवणुकीवरचा मुख्य उपाय म्हणजे शेतकऱ्याची मानसिक गुलामी नष्ट करणे हा आहे. जोतीरावांच्या मते त्यासाठी शेतकऱ्यांनी सर्वप्रथम कृत्रिम ब्राह्मणी धर्माचा, रीतीरीवाजांचा व विधींचा त्याग केला पाहिजे. शेतकऱ्यांनी सत्य धर्माचा स्वीकार केला पाहिजे. त्यांनी अनावश्यक विधी करू नयेत आणि लग्नासारखे आवश्यक विधी भटजीची मदत न घेता स्वत: करावे. अशी शिकवण जोतीरावांनी शेतकऱ्यांस दिली.

शेतकरी अज्ञानी व अक्षरशून्य असल्यामुळे आपल्या पिळवणुकीचे कारण तो जाणू शकत नाही. त्याला आत्मस्थितीचे ज्ञान आधुनिक विद्या संपादन केल्याशिवाय होणार नाही. सरकार शेतकऱ्याकडून शेतासारा व लोकल फंड गोळा करते. पण त्याच्या शिक्षणाची व्यवस्था करीत नाही. याबद्दल फुल्यांनी सरकारला दोष दिलेला आहे. गरिबांच्या शिक्षणासाठी शाळा उघडणे गरजेचे आहे. अडाणी पोटभरू आणि धार्मिक अंधश्रद्धेचा प्रचार करणारे ब्राह्मण पंतोजी शूद्रांना नको आहेत. त्यासाठी शूद्रातून नवे पंतोजी निर्माण करावे असे फुल्यांचे मत होते.

ब्राह्मणाच्या नोकरशाहीतील मक्तेदारीमुळे समाजावर त्यांनी आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. ते समाजावर अन्याय करतात, भ्रष्टाचार करतात, लाच खातात. शेतकऱ्यांच्या मनात त्यांच्याबद्दल बिलकूल आपुलकी नाही. म्हणून त्यांची नोकरीतील मक्तेदारी मोडण्यासाठी जोतीराव असे मत व्यक्त करतात की, प्रत्येक जातीला त्या जातीच्या संख्येच्या

प्रमाणात नोकऱ्या देण्यात याव्या. एकाच जातीची भरती केल्यामुळे अनिष्ट परिणाम होतात. फुले सांगतात, "अनुभवा स्वता लक्षून । सांगतो खरे निक्षून । सर्व जाती निवडून । घाण्या संख्या प्रमाण ।।"

जोतीरावांनी सरकारला शेतकऱ्यांची काळजी घेण्यास सांगितले आहे. कारण शेतकरी अज्ञानी आहेत. तो वाममार्गाने जाऊ शकतो. त्यास दारूचे व्यसन लागू शकते. त्यांनी गैरशिस्त वागू नये म्हणून डिटेक्टिव्ह डॉक्टरची नेमणूक करावी. शेतकऱ्यांनी एकापेक्षा जास्त बायका करू नयेत. मुलांची लग्ने लहानपणी करू नयेत. त्यांच्या मुलांना योग्य शिक्षण मिळाले पाहिजे. शूद्रांची मुले शिकून सरकारी अधिकारी, मामलेदार झाली पाहिजेत.

शेतीच्या बाबतीत जोतीरावांनी खालील सुधारणा करण्यात याव्यात असे सुचविले आहे :

१) शेतीची योग्य प्रकारे मशागत करता यावी म्हणून चांगल्या जातीच्या गायी-बैलाची पैदास करण्यात यावी. त्यासाठी सरकारने परदेशातून चांगल्या गाईचे बेणे आणावेत. गाई न मारण्याचा कायदा करावा.

२) डोंगर-टेकड्यांवराल गवत, पालापाचोळा, मेलेले कीटक व श्वापद यांच्या हाडामांसाचे सत्त्व, पानाफुलांचे कुजलेले खत पावसाच्या पाण्याबरोबर वाहून जाऊ नये म्हणून जागोजाग तालीवजा बंधारे बांधावेत. त्यामुळे वळवाचे पाणी एकंदरीत शेतात मुरून नदी-नाल्यास मिळेल. असे केल्याने शेते सुपीक होतील.

३) हे काम लष्करातील काळ्या-गोऱ्या शिपायांकडून करून घ्यावे. त्याचप्रमाणे पोलीस व शिपायांकडून डोंगर-टेकड्यांमधील दऱ्याखोऱ्यांनी तलाव, तळी जितकी होतील तितकी सोयीसोयीने बांधून काढावी. म्हणजे त्यांच्या खालच्या प्रदेशात ओढ्याखोड्यांनी भर उन्हाळ्यात पाणी असल्यामुळे जागोजागी धरणे होतील. विहिरींना पाणी मिळेल आणि बागायती शेती वाढेल.

४) शेते धुपून त्यात खोंगळ्या पडू नयेत म्हणून शेतकऱ्यांनी पाणलोटाच्या बाजूने शेतांच्या बांधांनी वरचेवर ताली दुरुस्त ठेवाव्यात.

५) ज्या ठिकाणी झरे सापडतील त्या ठिकाणी गावाच्या नकाशात नमूद करून विहिरी पडाव्यात. या विहिरी स्वत: बांधणारास लहानमोठी बक्षिसे देण्याची व्यवस्था सरकारने करावी.

६) एकंदर सर्व नदीनाले व तलावातील साचलेला गाळ पूर्वीप्रमाणेच शेतकऱ्यास फुकट नेऊ द्यावा.

७) गावराने फॉरेस्ट खात्यास सामील केली असतील तर ती शेतकऱ्यास वापस द्यावीत. जंगलातील इमारती लाकडे तोडू देऊ नयेत, पण इतर लाकूडफाटा तोडण्याची मुभा असावी.

८) उत्तम शेळयामेंढ्याची पैदास वाढविण्यासाठी परदेशातून त्यांची बेणी आणावी.

९) शेतकऱ्यांचा व त्याच्या पिकांच्या जंगली जनावरांपासून बचाव करण्यासाठी गावठी तोड्याच्या बंदुका शेतकऱ्यास द्याव्यात. शेतकऱ्यांची पिके जर जनावरांनी खाल्ली वा त्यांची नासाडी केली तर सरकारने त्याची नुकसानभरपाई पोलीस खात्यातील वरिष्ठ अंमलदारांचे पगार कापून करावी.

१०) साल दरसाल श्रावण मासी प्रदर्शने करून अश्विन मासी शेतपिकांच्या व औते हाकण्याच्या परीक्षा घेऊन शेतकऱ्यांस बक्षिसे द्यावी. त्यांना पदव्या द्याव्या.

११) शेतकऱ्याच्या मुलास लोहारी, सुतारी कामाचे शिक्षण द्यावे. त्यांना विलायतेतील शेतीशाळा पाहण्यास पाठवावे. तेथील सुधारणा बघून ते आपल्याकडेही त्याच प्रकारच्या सुधारणा करू शकतील.

१२) शंभर रुपये पगाराच्या वरील सर्व अंमलदारांचे पगार कमी करावेत. त्यांच्या पेन्शनी कमी कराव्यात. मात्र शेतमजूर, कारागीर, लोहार, सुतार, बिगारी, डोलीवाले यांचे पगार कमी करू नयेत.

१३) शेतकऱ्यांच्या मुलास पुस्तके, पाट्या व पेन्सिली पुरवाव्यात. तसेच शेतकऱ्यास शेती सुधारण्यासाठी शेतीसंबंधीचे सर्व ज्ञान देऊन

त्यासंबंधी ग्रंथ उपलब्ध करावे.

१४) शेतकी शाळा स्थापन कराव्या.

म. फुले यांचे असे मत होते की, सरकारने शेतकऱ्यांसाठी आणि शेतीसाठी या सुधारणा अमलात आणल्याखेरीज शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारणार नाही.

म. फुले यांनी 'शेतकऱ्याचा आसूड'मध्ये अशा प्रकारे अनेक मूलग्रामी विचार मांडले. शेतकऱ्यांची उन्नतीची चळवळ वर सांगितलेल्या कार्यक्रमाच्या आधारावर बांधली जावी असे त्यांचे मत होते. त्यांचे अंतिम धेय्य 'बळीच्या राज्याची' स्थापना करणे हे होते. त्यांच्या लेखी 'बळीचे राज्य' हे शेतकऱ्यांचे राज्य होते.

## प्रकरण चौथे

# म. फुले यांच्या चळवळीचे राजकीय स्वरूप

जोतीराव फुले हे स्वातंत्र्याचे व मानवी अधिकारांचे पुरस्कर्ते होते. मनुष्यास स्वातंत्र्य आवश्यक आहे. तो स्वतंत्र असल्यावरच त्याला आपले सर्वसाधारण हक्क समजतात. आपले हक्क मागून घेण्यासाठी तो संघर्ष करतो आणि ते हक्क मिळाले असता त्यास सुख होते. फुल्यांच्या मते भारतात असे अधिकार शूद्रांना देण्यात आलेले नाहीत. आपले हे हक्क मिळविण्यासाठी त्यांना संघर्ष करावा लागेल. संघर्षाशिवाय आपले अधिकार मिळत नाहीत असे जोतीरावांचे मत होते.

शेतकरी हा पिडलेला आहे व त्याची मुक्तता झाली पाहिजे असे फुल्यांचे मत होते. सर्व शूद्रादी अतिशूद्रांची मुक्ती करावयाची झाली, तर कशा प्रकारचे राजकीय डावपेच आखण्यात आले पाहिजेत, याचा विचारही जोतीरावांनी केलेला होता. जोतीराव राजकीयदृष्ट्या अतिशय जागृत होते. शूद्र शेतकऱ्यांचा लढा हा राजकीय लढा आहे हे त्यांना पक्के माहीत होते, तसे राजकीय डावपेचही त्यांनी आखले होते.

**राजकीय सत्तेचे महत्त्व :**

जोतीराव फुले यांना ही गोष्ट व्यवस्थित समजलेली होती की, राजकीय सत्तेचे न्याय्य आणि लोकशाही वाटप झाल्याशिवाय खऱ्या अर्थाने भारतात सत्ता परिवर्तन होणार नाही. भारतात इंग्रजांची सत्ता असली तरी खालच्या पातळीवर सत्ता ब्राह्मणांच्या ताब्यात आहे. कारण राज्ययंत्रातील काही मोक्याच्या जागा त्यांच्या ताब्यात आहेत. त्यांचे सर्वांगीण वर्चस्व समाजावर स्थापन झालेले आहे. त्यांनी शूद्रातिशूद्रावर गुलामगिरी लादलेली असल्यामुळे त्यांच्या हातात जर सत्ता गेली तर ही गुलामगिरी जास्त बळकट होईल. १८५७ चे नानासाहेब पेशव्यांचे बंड, वासुदेव बळवंत फडक्यांचे बंड आणि काँग्रेसची स्थापना या सर्व गोष्टी ब्राह्मणांचे वर्चस्व समाजावर कायम ठेवण्यासाठीच निर्माण करण्यात आलेल्या आहेत असे म. फुले यांचे मत होते. त्यामुळे १९व्या शतकात जर भारतास स्वातंत्र्य मिळाले तर ब्राह्मण

पुन्हा आपले वर्चस्व स्थापन करतील अशी भीती जोतीरावांना वाटत होती.

म. फुले 'सार्वजनिक सभे'प्रमाणेच 'नॅशनल काँग्रेस'चेही मोठे विरोधक होते. त्याचे कारण काँग्रेस जरी देशाचे नाव सांगत असली तरी तो मुळात ब्राह्मणांचाच पक्ष आहे. 'मोघम नाव हिंदुंचे पण फायदा एकट्या ब्राह्मणांचा'' असा हा खाक्या आहे. सामाजिक प्रश्नांबाबत काँग्रेसचे धोरण पक्के नाही. सोवळेओवळे पाळणाऱ्या ब्राह्मणांच्या ती कपाळी लागली आहे. शूद्रातिशूद्रांबाबत त्यांच्या मनात दया नाही. शूद्रांचे अधिकार त्यांना सहजासहजी देववत नाहीत. 'शेतकऱ्याचा आसूड' च्या पाचव्या प्रकरणात ब्राह्मणांशी शेतकऱ्यांची एकी कां होऊ शकत नाही, याची कारणे जोतीरावांनी दिली आहेत. शेतकऱ्यांची धर्माच्या नावाने फसवणूक करून त्यांना आपल्यापेक्षा नीच मानणाऱ्या, लाच खाणाऱ्या, अस्पृश्यता पाळणाऱ्या, शेतकऱ्याच्या मुलास विद्या देण्यास कुचराई करणाऱ्या, शूद्रास नोकऱ्या न मिळू देणाऱ्या व मिळाल्यास त्याविरुद्ध कट करणाऱ्या भिकाऱ्यांस भीक देतानाही पक्षपात करणाऱ्या ब्राह्मणांशी शूद्रांची एकी कशी होणार, असा प्रश्न जोतीरावांनी विचारला आहे. सध्या जरी ब्राह्मण एकीच्या गोष्टी करीत असले, तरी ती एकी त्यांना स्वत:च्या फायद्यासाठी हवी आहे. पण वेळ येताच शूद्राचा गळा इंग्रजांच्या हातात देऊन ते पळून जातील. म्हणून जोतीराव बजावतात –

*जाळ तुझी फुकी एकी । धूर्त नटी अर्ध मुकी ।।*
*तुम्ही आर्य कार्य साधु । नव्हेत शूद्राचे हो बंधु ।।*
*ज्याला नाही सत्यभीती । त्याला कैची बंधुप्रीती ।।*

नॅशनल काँग्रेसला एकी हवी असेल तर तिच्या पाठीराख्यांनी आधी सत्यवर्तन करावे असे जोतीरावांचे त्यांना सांगणे होते. जोतीरावांच्या मते नॅशनल काँग्रेस राष्ट्रीय नाही. कारण ती 'एकट्या उपऱ्या' ब्राह्मणांनी स्थापन केली आहे. आपल्या देशातील शूद्रादी अतिशूद्र, भिल्ल, कोळी वगैरे सर्व लोक विद्वान होऊन विचार करण्यासारखे होईपर्यंत आणि या सर्व लोकांमध्ये पूर्ण एकात्मता स्थापन झाल्याशिवाय भारत राष्ट्र वा 'नेशन' होत नाही असे जोतीरावांचे मत होते. त्यामुळे काँग्रेसवर त्यांचा राग होता.

ब्राह्मणांचे हे वर्चस्व झुगारून लावण्यासाठी संघर्ष आवश्यक आहे आणि हा संघर्ष शूद्र आणि अतिशूद्र यांनी एकत्र येऊन केला पाहिजे असे जोतीरावांचे सांगणे होते. शूद्र आणि अतिशूद्र यांच्यात फारसा फरक नाही. त्यांच्या मते शूद्रातील जमीनदार, राजेरजवाडे पोकळ वैभवामुळे आणि अतिशूद्र केवळ दुर्दैवामुळे एकमेकांपासून दुरावलेले आहेत. म्हणून त्यांच्याशी आघाडी होऊ शकते. 'शेतकऱ्याचा आसूड' मध्ये वर्णिलेला मध्यम व कनिष्ठ शेतकरीच त्यांच्या चळवळीचा कणा होता. त्यास ते 'शूद्र दीनबंधू' म्हणून संबोधितात. या शूद्र दीनबंधूने पुढाकार घेऊन शूद्र आणि अतिशूद्र यांना एकत्र करून आपल्या मानवी अधिकाराची लढाई लढावी असे जोतीरावांचे सांगणे होते. त्यांचे 'आसूड' लिहिण्याचे प्रयोजन हेच आहे. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे मध्यम व कनिष्ठ दर्जाच्या शेतकऱ्यांत कुणबी, माळी व धनगर या तीन जातींचा समावेश होतो. पण फुले त्यांना तीन वेगवेगळ्या जाती मानीत नाहीत. त्यांच्या मते व्यवसायपरत्वे हे भेद त्यांच्यात पडले आहेत. स्वत:ला 'मराठा' म्हणून फुकट डौल मिरवून घेणारा तसा कुणबीच आहे आणि महाराष्ट्रात राहणारे सर्वच मराठे आहेत असे त्यांचे मत होते.

शूद्रातिशूदांच्या विकासास इंग्रजी राज्यामुळे चालना मिळाली म्हणून ते त्यांना इंग्रजास 'पोटी गच्च' धरा म्हणून सांगतात. या इंग्रजांच्या मदतीने शूद्रातिशूद्र मुक्त होत आहेत म्हणून त्यांचे राज्य भारतात अनेक वर्षे राहावे असे जोतीराव सांगत. इंग्रजांमुळे शूद्रांना अनेक क्षेत्रात चंचुप्रवेश करता आला पण इंग्रज येथे कायमचे राहणार नाहीत म्हणून शूद्रातिशूद्रांनी जलदी करून शिक्षण घ्यावे व ब्राह्मणांच्या वर्चस्वातून मुक्त व्हावे. भारतासारख्या देशात काही राजकीय अधिकार जर भारतीयांना देण्यात आले तर त्यांचा उपयोग फक्त ब्राह्मणांनाच होतो. हे सत्य ब्रॅडला, वेडरबर्न व लॉर्ड रिपन यांच्यासारख्या उदारहृदयी इंग्रजांस समजत नाही याचा फुल्यांना मोठा विषाद वाटत असे.

म. फुले यांनी राजकीय अधिकार भारतीय लोकांस मिळणार असतील

तर त्यात शेतकऱ्याचा वाटा किती हा महत्त्वाचा प्रश्न सुमारे १०० वर्षांपूर्वी विचारला. आजही तो प्रश्न महत्त्वाचा आहे.

## फुले आणि ब्राह्मण्य :

जोतीराव फुले यांनी ब्राह्मणांवर व ब्राह्मण्यावर कठोर हल्ले केले. त्यांच्या मते शूद्रांच्या सध्याच्या परिस्थितीला ब्राह्मणांचे कपट जबाबदार होते. पण भारतातील जातिसंस्था केवळ ब्रह्मकपटातून निर्माण झालेली नव्हती. तिच्या निर्मितीमागे गुंतागुंतीची सामाजिक प्रक्रिया होती. त्यात ब्राह्मणांनी केलेली फसवणूक महत्त्वाची होतीच पण इतर सामाजिक शक्तीही त्यात भाग घेत होत्या. पण दुर्दैवाने फुल्यांचे त्याकडे जावे तितके लक्ष गेले नाही. त्यामुळे काही वेळा त्यांच्या लिखाणात विलक्षण पूर्वग्रह दिसून आला. पण ब्राह्मणांबाबत त्यांची भूमिका जातीय नव्हती. ''मांगा भटा ऐक्य करू । बसवी पंक्तींनी'' ही त्यांची मनीषा होती. म्हणून ते कळवळून ब्राह्मणांस सांगतात –

*बंधु आर्यराजा दयावान व्हावा । जाळून टाकावा । मनूग्रंथ ।।*<br>*वेदान्ती म्हणता तुम्हा कैचा भेद । लावा पाहू दाद । मनुजांची ।।*<br>*सांडू नका ख्रिस्ती मुसलमानास । मांगामहारास । शूद्रासह ।।*<br>*निर्धाराने धरी सद्‌विवेकास । कित्ता संतानास । जोती म्हणे ।।*

वरील अभंगावरून याबाबत त्यांची दृष्टी किती निकोप होती हे दिसून येते. फुल्यांचा विरोध ब्राह्मणास नव्हता तर त्यांचा विरोध ब्राह्मण्यास होता आणि हे ब्राह्मण्य ब्राह्मणेतरात दिसून आले तर जोतीराव त्यांच्यावरही किती कठोर हल्ला करीत असत हे त्यांनी भालेकरांवर केलेल्या टीकेवरून दिसून येते.

## जोतीरावांच्या शेतकरी प्रश्नांवरील लिखाणातील काही उणिवा :

जोतीरावांनी त्यांच्या लिखाणातून शेतकऱ्यांची दैन्यावस्था फार परिणामकारकरीत्या वर्णन केली आहे. परंतु शेतकऱ्यांच्या दैन्याच्या कारणांची त्यांनी केलेली मीमांसा पुरेशी नव्हती. म. फुल्यांच्या लिखाणातील

खरी उणीव साम्राज्यशाहीने केलेल्या शोषणाबाबतचा त्यांचा दृष्टिकोन ही आहे. त्यांनी आपल्या लिखाणात इंग्रजी अंमलाचे शेतकऱ्यावर होणारे दुष्परिणाम चांगल्या प्रकारे दाखविले. पण त्याबाबत त्यांना दोष दिला नाही. इंग्रज राज्यातील शिक्षण, न्यायपद्धती, विद्याप्रांतात स्त्रीशूद्रांना चंचुप्रवेश करण्यास मिळालेली संधी आणि त्यांची धर्म, पंथ, भेदभावरहित राजवट यांनी ते पुरते भारले होते. परंतु वारंवार येणारा दुष्काळ, डोईजड शेतसारा, इंग्रज अधिकाऱ्यांचा निष्काळजीपणा आणि ऐषआरामी, विषम व्यापार, परकीय कर्ज, गोऱ्या लोकांचे लठ्ठ पगार व पेन्शनी यामुळे आपला शेतकरी कंगाल बनला आहे हे त्यांनी सातत्याने मांडले. या शोषणास ब्राह्मण नोकरांपेक्षा या देशाला लुबाडून खाणारे ब्रिटीश साम्राज्यशहा खऱ्या अर्थाने जबाबदार आहेत हे वास्तव मात्र त्यांच्य पुरेसे लक्षात आले नाही.

सरकारी धोरणे, सरकारी कायदे व सरकारी निर्णय हेच सारावाढीस, सावकारांकडे शेतकऱ्यांची जमीन हस्तांतरित होण्यास, शेतमालास वाजवी भाव न मिळण्यास, दगाबाज दलाल व कमिशन एजंट यांची चंगळ होण्यास जबाबदार होते. सावकारशाहीला राज्यसत्तेचा पाठिंबा असल्यामुळेच सावकार शेतकऱ्यास लुटीत होते. साम्राज्यवादी सरकारने विषम बाजारपेठेमार्फत येणारी तूट शेतकऱ्यांच्या माथी मारण्याचे धोरण जाणूनबुजून अमलात आणले होते. खेड्यातील व्यापारी दलाल व सावकार हे त्या जगद्व्याळ वासाहतिक शोषण पद्धतीचा आणि ती भारतावर लादणाऱ्या इंग्रज सरकारचा अंगभूत गुणधर्मच होता. त्यातून त्यांना हवा असणारा नफा ते उकळीत होते.[१४] सावकार आणि भट कामगार या सरकारचे या शोषणातील भागीदार होते. पण जोतीरावांना असे वाटते की, ब्राह्मण मलई खात आहेत व त्यांनी इंग्रजांना दुधावर ठेवले आहे. पण वस्तुस्थिती अगदी उलट होती. ब्राह्मणांना व भांडवलदारांना मलईत हिस्सा हवा होता. दूध व मलई निर्माण करणारा शेतकरी मात्र ताकपाण्यावर होता.

साम्राज्यशाहीचे हे स्वरूप जोतीरावांना पूर्णपणे ओळखता आले नाही. म्हणून त्यांनी त्यांच्या राजकारणात ब्रिटिशांच्या दोस्तीला मोलाचे स्थान दिले. त्यामुळे जोतीरावांच्या चळवळीस साम्राज्यशाहीविरोधाचे टोक येऊ

शकले नाही. समाजातील मुख्य अंतर्विरोध साम्राज्यशाही व कष्टकरी शेतकरी यांच्यात आहे ही गोष्ट त्यांच्या लक्षात आली नाही. ती पुढे म. गांधी आणि पं. जवाहरलाल नेहरू यांच्या लक्षात आली.

म. फुले यांच्या विचारातील दुसरी मोठी उणीव म्हणजे शेतकरी समाजातील वर्गीय भेदांकडे त्यांनी केलेले दुर्लक्ष. जोतीरावांच्या काळातही शेतकऱ्यांचे तीन वेगवेगळे थर होते आणि मध्यम व कनिष्ठ शेतकऱ्याची दशा वर्णन करून जोतीरावांनीही या थरांचे अस्तित्व मान्य केले आहे. परंतु त्यांच्या विश्लेषणात त्यांनी संपूर्ण शेतकरी समाजास एकसंध मानले आहे. त्यांनी त्यांच्यातील वर्गीय भेदांना विशेष महत्त्व दिले नाही. आठ बैलांच्या मदतीने शेती करणारा शेतकरी आणि पाभरीचे दहा-पंधरा पेरे जमीन मिळणारा छोटा शेतकरी यांना त्यांनी एकच मानले. पण पाणी मिळताच काही शेतकरी सधन होऊ शकतात हे वास्तव त्यांनी पुरते लक्षात घेतले नाही.

जोतीरावांनी स्वत: कष्ट करणारा, रयतवादी व्यवस्थेत सावकार आणि भिक्षुक यांच्या तिहेरी पिळवणुकीतून मुक्त झालेला विद्यावंत, स्वतंत्र आणि सहिष्णू अशा शेतकऱ्यांचा समाज स्थापन करावयाचा होता. त्यामध्ये त्यांना कोणाचेही शोषण अभिप्रेत नव्हते. ते लिहितात –

*क्षत्रियांनो, तुम्ही कष्टकरी व्हावे । कुटुंबा पोसावे । आनंदाने ।।*
*नित्य मुली मुला शाळेत घालावे । अन्नदान द्यावे । विद्यार्थ्यांना ।*
*सार्वभौम सत्य स्वत: आचरावे । सुखे वागवावे । आर्यभट्ट ।।*

जोतीरावांनी शेतकऱ्यातील वर्गीय भेदाकडे तसे दुर्लक्षच केले.

जोतीरावांच्या लिखाणातील आणखी एक उणीव म्हणजे त्यांनी औद्योगीकरण व कारखानदारी यांचे महत्त्व ओळखले नव्हते. औद्योगिक विकासातून व कारखानदारीच्या स्थापनेतून लोकशाहीचे काही क्रम विकसित होत असतात हे जोतीरावांनी लक्षात घेतले नाही. औद्योगीकरण आणि कारखानदारी यांकडे त्यांनी दुर्लक्ष केल्यामुळे औद्योगिक विकास व शेतकरी यांच्यातील परस्परसंबंध त्यांनी व्यवस्थितरीत्या मांडले नाहीत. त्यामुळे या

विषयावरचे त्यांचे विचार अपुरेच राहिले.

## सत्यशोधक आणि ब्राह्मणेतर चळवळ :

जोतीरावांनी ज्यावेळी 'सत्यशोधक चळवळ' सुरू केली त्यावेळी महाराष्ट्रातील अनेक नामवंत ब्राह्मणेतरांचा त्यांना पाठिंबा मिळाला. त्यांच्या सत्यशोधक समाजात अनेक मुसलमान सभासद होते. त्यात डॉ. विश्राम घोले, डॉ. लाड, गंगारामभाऊ म्हस्के, लोखंडे यांचा समावेश होतो. जोतीरावांच्या काळात व नंतरही सत्यशोधकी विचार सत्यशोधक जलसे करून गावोगाव पसरविण्यात आले. त्यांना शेतकऱ्यांचा मोठा पाठिंबा मिळाला.

पण नंतरच्या काळात जोतीरावांची चळवळ सत्यशोधक कमी आणि ब्राह्मणेतर जास्त झाली. सत्यशोधक चळवळीत जर एखाद्या ब्राह्मणास सत्यशोधक विचार मान्य असले तर सामील होता येत असे. पण ब्राह्मणेतर चळवळ फक्त ब्राह्मणेतरांनाच खुली असल्यामुळे त्यांना त्यात प्रवेश नव्हता. सत्यशोधक व ब्राह्मणेतर चळवळीतील कार्यकर्त्यांनी महाराष्ट्रातील खेडोपाडी धर्म आणि राजकारण याबाबत मोठी जागृती निर्माण केली. हे करीत असताना त्यांच्या प्रचाराचा भर सरंजामशाहीविरुद्ध (भटशाही) होता. ब्रिटीश साम्राज्यवाद आणि भांडवलशाही यांचाही तेवढ्याच निकराने विरोध केला पाहिजे, हे सत्य त्या काळच्या सत्यशोधकांच्या पूर्णत: लक्षात आले नाही.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीस इंग्रज राज्यकर्ते काही जातींना आणि वर्गांना पुढे सरकण्यासाठी हळूहळू थोडासा वाव करून देत होते. त्यामुळे या जातीतील पुढारी साम्राज्यशाही वा सरंजामशाही यांच्यावर सरळ तुटून पडण्याऐवजी इंग्रजांनी निर्माण करून दिलेल्या जागांसाठी परस्परात भांडू लागले. त्यामुळे निरनिराळ्या जाती व वर्ग यांत स्पर्धा निर्माण झाली. १९१९ च्या माँटेग्यू चेम्सफर्ड सुधारणेनंतर तीही प्रक्रिया जास्त वेगाने सुरू झाली. सरकारी नोकरीतील काही जागा ब्राह्मणांशी स्पर्धा करून मिळविणे, विधानसभेत काही जागा राखीव करून जिंकणे आणि सत्येच्या निरनिराळ्या

दालनात स्वत:चा चंचुप्रवेश करून घेणे ही या स्पर्धात्मक सुधारणावादी राजकारणाची वैशिष्ट्ये असतात. त्यामधून लोकशाही विकासाचे काही क्रम निश्चित पुढे जातात हे खरे, पण या राजकारणाचा मुख्य आशय असतो सरंजामशाही, साम्राज्यशाही आणि भांडवलशाही यांच्याशी करण्यात आलेली तडजोड.[१५] या तडजोडीच्या राजकारणांमुळे साम्राज्यशाही व भांडवलशाही यांच्या विरुद्ध संघर्ष करण्याचे धोरण स्वीकारणे ब्राह्मणेतर पक्षास कधीच जमले नाही.

जोतीरावांना आपली चळवळ कनिष्ठ व मध्यम शेतकऱ्यांच्या पाठिंब्यावर उभी करावयाची होती. पण ब्राह्मणेत्तर चळवळीस मात्र अनेक श्रीमंत व्यापारी, राजेरजवाडे, जमीनदार, रावबहादूर व रावसाहेब सामील झाले. कोल्हापूरच्या राजर्षी छत्रपती शाहूमहाराजांचा अपवाद वगळता बाकीच्यांना समाजसुधारणेची फारशी आच नव्हती. त्यामुळे ब्राह्मणेतर पक्ष आणि त्या पक्षातील अनेक पुढारी ब्रिटीश साम्राज्यवादाबाबत मऊ धोरण स्वीकारत होते. म्हणून त्यांच्यावर सोलापूरच्या वालचंद कोठारी आणि प्रबोधनकार ठाकरे यांनी अतिशय कठोर शब्दांत टीका केली. ब्राह्मणेतर पक्षाच्या या राजकारणाचे फलित म्हणजे साताऱ्याच्या धनशा कूपर या लक्षाधीशाचे राजकारण हा होय. १९३७ पूर्वी व नंतर धनशा कूपर यांनी मुंबई प्रांताच्या राजकारणावर वर्चस्व निर्माण केले व काही काळ ते मुंबई प्रांताचे पंतप्रधानही बनले. म. फुले यांच्या तत्त्वज्ञानातील सत्त्व काय आहे आणि बाह्य आवरण काय आहे, बदलत्या काळातही त्यातील कोणता भाग प्रगतीला पोषक आहे व कोणता भाग प्रगतीला मारक आहे हे न समजल्यामुळे असा प्रसंग ओढवला. अशा प्रकारे ब्राह्मणेतर चळवळ पैसेवाल्यांच्या, रावसाहेबांच्या व रावबहादुरांच्या दावणीला बांधली गेली. त्यामुळे केशवराव जेधे, जवळकर, मोरे, आनंदस्वामी वगैरे पुढारी १९३० साली काँग्रेसमध्ये सामील झाले. महाराष्ट्रीय शेतकरी समुदाय काँग्रेसच्या पाठीमागे उभा राहिला. जेधे 'महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस'चे अध्यक्ष झाले. १९३६ साली जळगाव जिल्ह्यात फैजपूर येथे काँग्रेसचे अधिवेशन भरवण्यात आले. परिवर्तनाचे एक आवर्त पूर्ण झाले.

शूद्र शेतकरी आणि अतिशूद्र यांची एकी जोतीरावांना अभिप्रेत होती. जातीच्या श्रेष्ठत्वाचा पोकळ डौल मिरविणारांचा म्हणून त्यांनी धिक्कार केला. कुणबी, माळी, धनगर हे सर्व एकाच जातीचे शेतकरी आहेत अशी त्यांची शिकवण होती. पण या चळवळीतही जातीयवादाने चंचुप्रवेश केला. या जातीवादाचा त्रास कमीजास्त प्रमाणात सर्वच पुढाऱ्यांना झाला. कारण स्पर्धात्मक सुधारणावादाची ती परिणती असते. पुढे त्यामुळे शूद्र आणि अतिशूद्र यांच्यात बेकी झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे म्हणाले होते की, ''आपणही सत्यशोधक आहोत. कारण सत्यशोधक चळवळ ही सद्धर्म स्थापनेची चळवळ आहे'' महार व तळयाच्या प्रश्नांवर डॉ. आंबेडकर व ब्राह्मणेतर पक्षांच्या नेत्यांमध्ये तेढ निर्माण झाली. ''ब्राह्मणेतरही वेळ मिळाल्यास अतिशूद्रांवर ब्राह्मणांप्रमाणेच जुलूम करतात'' असे बाबासाहेबांचे मत होते. पुढे १९३० साली ब्राह्मणेतर पक्षाचे पुढारी काँग्रेसात गेले आणि शूद्र आणि अतिशूद्र यांच्यात जी क्रांतिकारी एकी जोतीरावांना अपेक्षित होती ती झाली नाही. खरे पाहिले असता त्या काळात मुंबई प्रांताच्या काँग्रेसवर ब्राह्मणांचे व भांडवलदारांचे मोठेच वर्चस्व होते. त्यामुळे बहुजनसमाजातील पुढाऱ्यांची तेथे डाळ शिजली नाही. म्हणूनच पुढे त्यांना १९४८ साली काँग्रेसबाहेर येऊन 'शेतकरी कामगार पक्षा'ची स्थापना करावी लागली.

साम्राज्यशाही शोषणामुळे १९३० नंतरचा महाराष्ट्रातील शेतकरी वरचेवर क्रांतिकारक बनत होता. १९३२-३३ साली श्री. दिनकरराव जवळकर यांनी 'क्रांतीचे रणशिंग' हे पुस्तक लिहून समाजवादाचा उद्‌घोष केला होता. १९४०-४५ या काळात साताऱ्यात क्रांतिसिंह नाना पाटील यांनी प्रतिसरकार स्थापन करून शेतकऱ्यांच्या राज्याचा प्रयोग सुरू केला होता. १९४८ साली 'शेतकरी कामगार पक्षा'ची स्थापना झाली आणि वर्षभरात त्या पक्षाने आपल्या 'दाभाडी प्रबंधात' मार्क्सवादाचा स्वीकार केला. परंतु महाराष्ट्रातील डावी चळवळ या शेतकरी समूहास खऱ्या अर्थाने क्रांतिप्रवण करू शकली नाही ही वस्तुस्थिती आहे.

## स्वातंत्र्योत्तर काळातील बदल व शेतकरी चळवळ :

स्वातंत्र्यानंतर नियोजनबद्ध विकासाचे नवे पर्व सुरू झाले. शेतीमधील सरकारी गुंतवणूक पूर्वीपेक्षा वाढली. वीज गावोगावी पोहोचली. धरणे व

कालवे बांधण्यात आले. विजेवर पाण्याचे पंप सुरू झाले. 'कसेल त्याची जमीन' हे तत्त्व अमलात आले. जमीन कसणारे अनेक ठिकाणी जमिनीचे मालक झाले. या सर्व सुधारणा शेतकऱ्यांनी प्रांतोप्रांती 'किसान सभा' स्थापन करून सरकारवर दबाव आणून आपल्या पदरात पाडून घेतल्या. त्यातून शेतकरी जास्त स्वावलंबी झाला. पण कोरडवाहू जमीन कसणारा शेतकरी व छोटा शेतकरी यांच्या विकासास फारशी गती मिळाली नाही.

१९६५-६६ नंतर देशात हरितक्रांती सुरू झाली. वीज, खते, सुधारलेली बी-बियाणे व सहकारी संस्थांकडून मिळणारी माफक व्याज दराची कर्जे यामुळे हे परिवर्तन शक्य झाले. पण या परिवर्तनाचा फायदा सधन व मोठ्या शेतकऱ्यांना मिळाला. सधन जमीनदारांचा व बागायतदारांचा एक नवा थर समाजात निर्माण झाला. या वर्गातील शेतकऱ्यांची मुले, मुख्यमंत्री, खासदार, आमदार, जिल्हा परिषदेची अध्यक्ष झाली. पण शेतकरी समूहवर्गात विभागला गेला. छोटे शेतकरी व शेतमजूर यांची परिस्थिती फारशी बदलली नाही. त्यांच्यासाठी सधन शेतकऱ्यांच्या विकासास पूरक अशी रोजगार हमी योजना सुरू झाली. सधन शेतकरी आणि शेतमजूर यांच्यात वर्गीय संघर्ष सुरू झाले. मध्यम जातीतील शेतकरी व अतिशूद्रातील शेतमजूर यांच्यात संघर्ष सुरू झाले. उत्तर प्रदेशात अलीकडेच आग्रा येथे जाट शेतकरी आणि जाट शेतमजूर यांच्यात दंगे झाले. सध्या ग्रामीण सधनाचा पवित्रा आक्रमक आहे.

शेतकरी बाजारातील विषम व्यापारशर्तीमुळे लुटला जात आहे. म्हणून 'शेतमालाचे बाजारभाव बांधून द्या' ही मागणी करीत भारतातील वेगवेगळ्या प्रांतात आज शेतकऱ्यांच्या चळवळी सुरू झाल्या आहेत. १९८३ साली महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीचे नेते शरद जोशी यांनी फुल्यांना मानाचा शतकाचा मुजरा केला. त्यांच्या मते शेतीतील लूट हे भांडवल निर्मितीचे साधन आहे याची स्पष्ट जाण जोतीबांना होती. समाजाचा इतिहास हा शेतीतील गुणाकाराच्या वाटपाचा इतिहास आहे, हे सत्य त्यांना समजलेले होते. शेतकऱ्यांत भेद नसून सर्व कष्टकरी, शेतकरी एकसंध आहे आणि शहरातील नोकरांचे पगार व पेंशन्स शेतकऱ्यांच्या लुटीवर आधारलेले

आहेत, ही जोतीरावांची मते शरद जोशींना मान्य आहेत.[१६]

१९८० नंतर महराष्ट्रात सुरू झालेली शेतकरी संघटनेची चळवळ कोरडवाहू शेतकऱ्यांत जास्त लोकप्रिय आहे. कारण कोरडवाहू शेती अजूनही निसर्गाधीन आहे. पण त्या भागातही शेतकऱ्यांच्या विविध थरातील अंतर्विरोध हळूहळू पुढे येत आहेत. पुढील काळात छोटे व मध्यम शेतकरी आणि शेतमजूर यांचे प्रश्न जास्त निकराचे बनणार आहेत.

## जोतीरावांच्या विचारांचे समकालीन महत्त्व :

'शेतकऱ्याचा आसूड' हा ग्रंथ आजही तितकाच महत्त्वाचा मानला जातो. कारण या ग्रंथात जोतीरावांनी शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासाचा प्रश्न उपस्थित केला होता. आज शेतकरी खऱ्या अर्थाने धर्म, संस्कृती, नोकरशाही, सरकार यांच्या जुलमातून मुक्त झाला आहे असे म्हणता येणार नाही. अजूनही आपणास बारा वर्षांच्या खालील सर्व स्त्री-पुरुषांना मोफत सक्तीचे शिक्षण देता आले नाही. शेकडा ६० टक्कांपेक्षा जास्त लोक निरक्षर आहेत. १० पैकी फक्त ४ मुले चौथीनंतर शाळेत जातात. शाळेत मोठ्या प्रमाणात गळती आहे. दिले जाणारे शिक्षण हे निकृष्ट आहे. शिक्षक निरनिराळ्या जातीतून आलेले असले तरी चांगले शिकविले जात नाही. शिक्षणाची ही जी दयनीय अवस्था आहे, तिची शिकार या देशातील बहुसंख्य शेतकरी वर्गच आहे. म्हणून शेतकऱ्याच्या शिक्षणाविषयीचे जोतीरावांचे विचार आजही महत्त्वाचे आहेत.

जोतीरावांनी श्रम करणारा शेतकरी हा आपल्या विचारांचा केंद्रबिंदू ठरविला होता. मध्यम व कनिष्ठ शेतकरी हा त्यांच्या विश्लेषणाचा आधार होता. या शेतकऱ्यांनी शेती कशी विकसित करावी याबाबत उपाययोजना जोतीरावांनी त्यांच्या पुस्तकांतून सुचविली. त्यांनी सुचविलेला शेती सुधारणेचा कार्यक्रम अमलात आणण्यासाठी कनिष्ठ व मध्यम दर्जाच्या शेतकऱ्यांची चळवळ उभी करणे आज गरजेचे बनत चालले आहे.

शेतीबरोबरच पाणी प्रश्नही आज महत्त्वाचा बनत चालला आहे. शेतीसाठी पाणी असणे मोठे गरजेचे आहे हे जोतीरावांनी ओळखले होते.

म्हणून त्यांनी 'पाणी अडवा, पाणी जिरवा' ही घोषणा करून पाणी अडवून जमिनीची धूप कशी थांबवावी याबाबत विचार मांडले. पाण्याची नासाडी होऊ नये असे त्यांचे मत होते. पाण्याचे वाटप करीत असताना ते नीट होत नाही म्हणून जोतीरावांनी असे विचार मांडले की, प्रत्येक शेतकऱ्यास पाणी मापून मिळावे आणि प्रत्येकाला पाण्याची तोटी मिळावी. म्हणजे त्यास पाटकऱ्यांवर अवलंबून रहावे लागणार नाही. आज महाराष्ट्रभर या दोन्ही विषयांची चर्चा होत आहे. त्यासाठी चळवळी उभारल्या जात आहेत. यावरून जोतीराव किती दृष्टे विचारवंत होते हे आपल्या लक्षात येईल.

जोतीरावांनी शेतकऱ्यांच्या कमाल जमीन धारणेचा व जमीन वाटपाचा प्रश्न त्यांच्या पुस्तकात उपस्थित केला नव्हता. पण आज तो प्रश्नही काही भागात–विशेषत: बिहार, मध्य प्रदेश, आंध्र, ओरिसा या प्रांतात– महत्त्वाचा प्रश्न आहे. जोतीरावांनी जातिविरोधी संघर्षास त्यांच्या तत्त्वज्ञानात मध्यवर्ती स्थान दिले होते. त्यांनी शूद्र शेतकरी आणि अतिशूद्र यांच्यातील आघाडीची कल्पना मांडली होती. सध्याच्या व्यवस्थेची कोंडी फोडण्यासाठी आजही शूद्र आणि अतिशूद्र यांच्यातील म्हणजेच मध्यम व कनिष्ठ दर्जाचे शेतकरी आणि शेतमजूर व कारागीर अतिशूद्र यांच्यात एकी होणे गरजेचे आहे. जोतीरावांचा हा विचार आजच्या शेतकरी चळवळीसाठीच नव्हे तर समग्र समाज परिवर्तनासाठी महत्त्वाचा आहे.

आज ब्राह्मण्य हे केवळ ब्राह्मण जातीपुरतेच मर्यादित राहिले नसून ते इतर जातीतही प्रस्थापित होत आहे. त्यामुळे ते व्यापक परिवर्तनाच्या आड येत आहे. 'शूद्रातील' नोकरशाही या 'ब्राह्मण्याने ग्रस्त' आहे. त्यामुळे व्यापक जातिनिर्मूलनाचा लढा लढत असताना हा बदलता संदर्भ आपणास लक्षात घ्यावा लागतो. म. फुले त्याबाबत सावध होते.

❒❒❒

## संदर्भ ग्रंथ


१) Kumar R. Western India in 19th Century: Routledge and Kegar Paul London 1968/7/100/101.

२) पाटील व्ही. एम., वासाहतिक समाजातील शेतकरी प्रश्न, अप्रकाशित एम. फिल. प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर १९८८, पृष्ठ १९-२०.

३) Kumar Ibid p. 164-67.

४) Ibid, p. 158.

५) Majumdar R. C., (Ed.) British paramoutry and Indian Renaissance, Bharatiya Vidya Bhavan, Bombay, 1970 p. 886.

६) Chandra B., Rise and growth of economic Nationalism in India, Delhi, p. 163.

७) Sunthankar B. R., History of Modern Maharashtra (1818-1857) Vol. I, Shubhada Sarasvat Pune, 1988.

८) Kumar & Ibid p. 216.

९) Ibid p. 297.

१०) कीर धनंजय, म. जोतीराव फुले - आमच्या समाजक्रांतीचे जनक, पॉप्युलर, मुंबई, १९६८ पृ. १७९.

११) तत्रैव, पृ. ३३-३४.

१२) पाटील पंढरीनाथ, म. जोतीराव फुले (दुसरी आवृत्ती), मनोविकास प्रकाशन, मुंबई १९८९, पृ. १२४.

१३) चौसाळकर अशोक, 'म. फुले यांचे लोकशाहीविषयक विचार'. पृष्ठ २८-२९, नवभारत सप्टें. १९८२.

१४) पाटील व्ही. एम., उपरोल्लिखित, पृ. ९४.

१५) Auti V. B. and Chouralkar A. S., "Nature of Political thought of Jotirao Phule" pp. 7-22 in Ideas Movements and Politics in India Edited by Kavlekar and Chousalkar A. S. Ajab Kolhapur 1986.

(१६) जोशी शरद, शेतकऱ्याचा आसूड - हा शतकाचा मुजरा (दुसरी आवृत्ती) शेतकरी प्रकाशन, अलीबाग, १९८९, पृष्ठ ३८-३९.

❐❐❐

124303
31.3.08

Library IIAS, Shimla
MR 891.468 C 395 M
00124303

I. I. A. S. LIBRARY

Acc. No.

This book was issued from the library on the date last stamped. It is due back within one month of its date of issue, if not recalled earlier.

CP&SHPS—519-I.I.A.S./2004-25-6-2004-20000.

# आमची इतर प्रकाशने

- **जोतीबा फुले आणि स्त्री-मुक्तीचा विचार**
  डॉ. गेल ऑम्व्हेट — २० रु.
- **महात्मा फुले यांचे शैक्षणिक कार्य**
  प्रा. तानाजी ठोंबरे — २० रु.
- **महात्मा फुले आणि शेतकरी चळवळ**
  डॉ. अशोक चौसाळकर — २० रु.
- **जोतीरावांची समता-संकल्पना**
  भास्कर लक्ष्मण भोळे — २० रु.
- **महात्मा फुले आणि सांस्कृतिक संघर्ष**
  भारत पाटणकर — २० रु.
- **महात्मा फुले आणि धर्म**
  आ. ह. साळुंखे — २० रु.
- **डॉ. आंबेडकर यांचे राजकीय विचार**
  प्रा. म. द. देशपांडे — ३० रु.
- **डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक आणि राजकीय चळवळी**
  कृष्णा मेणसे — ३० रु.
- **महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे आर्थिक आणि सांस्कृतिक विचार**
  पी. डी. दिघे — [illegible] रु.
- **म. विठ्ठल रामजी शिंदे यांच्या राजकीय व सामाजिक चळवळी**
  तानाजी ठोंबरे
- **विठ्ठल रामजी शिंदे यांचे बहुजनवादी राजकारण**
  भा. ल. भोळे — ५० रु.

Library IIAS, Shimla
MR 891.468 C 395 M
00124303